# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक १८/०२/२००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.५० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक

२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४५. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४६. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४७. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५०. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६०. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६१. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६२. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६३. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव

६५. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६६. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६८. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६९. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७०. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७१. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७२. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७३. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७४. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७६. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८१. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

श्री.अ.रशिद खान :पै. मौलाना असद मदनी यांचे दु:खद निधन झालेले आहे ते माजी खासदार होते. त्यांना सभांगृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री. संजय सिरसाट :यास माझे अनुमोदन आहे परंतू यापूर्वी संपन्न झालेली सर्वसाधारण सभा ते आजची सर्वसार्वसाधरण सभेपर्यत जे की एक महिन्यामधे ज्यांचे कुणाचे निधन झालेले असतील ज्ञात आणि अज्ञात ज्यांचे नाव माहित नाही अशा सर्वांना या सभागृहा मार्फत श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

(याच वेळी सभागृहात पै. मौलाना असद मदनी तसेच जे मागिल महिनाभरात ज्यांचा कूणाचा मूत्यू झाला असेल अशा सर्वांना ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :सभा दिलेल्या वेळेस सूरू होत नसेल तर विषयपत्रिकेवर वेळ देण्यात येवू नये जेंव्हा सदस्य येतील तेंव्हा सभा सूरू करावी.

श्री. संजय सिरसाट :मा.आयुक्त आजच्या सभेला उपस्थित नाही. सुट्टीवर आहेत का?

मा. महापौर :या बध्दल मला काहीही माहिती दिलेली नाही.

याच वेळी मा. आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.

श्री.सिताराम सूरे :पदमपूरा येथील जागा महानगरपालिकेने घेण्याचा प्रयत्न करीत आहे. सदर जागेचा वाद न्यायालयात प्रलंबित असून जागेचे महानगरपालिकेकडे ताबा नसतांना दिनांक ९ डिसेंबर २००५ रोजी बी.ओ टी तत्वावर जागा विकसीत करण्यासाठी टेंडर कशाच्या अधारे काढलेले आहे. मा. न्यायालयाची स्थगिती असतांना का जागा घेण्याचा प्रयत्न होत आहे.

मा.महापौर :मालमत्ता संदर्भात लेखा परींक्षणाचा अहवाल मागच्या वेळी मागविलेला होता. तो अहवाल माझ्याकडे सादर झालेला आहे. त्या अहवालाच्या प्रति सर्व सदस्यांना सचिव यांनी दयाव्यात.यावर सर्व सदंस्यांनी अभ्यास करावा व पूढील बैठकीत यावर चर्चा करून निर्णय घेतला जाईल. मा. सभापती स्थायी समिती यांनाही विनंती की या बाबतीत स्थायी समितीमधे चर्चा करून योग्य ते कार्यवाही चे निर्देश देवून या सभागृहासमोर ठेवण्यात यावेत.

श्री.त्र्यबंक तुपे :शहरात अनेक रस्त्यावरील लाईट बंद आहे मागिल बैठकीत या संदर्भात चर्चा ही झालेली होती. टेडंर झाले असेल तर कार्यवाही करण्याच्या सूचना कराव्यात.

मा.महापौर :मागिल बैठकीत लाईटची कामे करण्यासाठी हेड चेंज करून ५० लक्ष रूपये देण्यात आलेले होते. टेंडर अंतिम झालेले आहेत काय किती दिवसात काम सूरू होईल याचा खूलासा करावा.

शहर अभियंता :लाईटची कामे करण्यासाठी टेंडर काढण्यात आलेले असून फायनल पण झालेले आहे. २ ते ४ दिवसात काम सुरू होवून १ महिण्यात संपूर्ण कामे होतील.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :महानगरपालिकेची काम करण्याची पध्दतीची सदस्यांना माहिती व्हावी. एकदा बजेट तरतूद झाल्यानंतर टेंडर काढल्यानंतर पून्हा लेखाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी का जाते. बजेट तरतूद ही लेखा विभागामार्फतच होते. १० महिने झाले कोणतेही विकास कामे झालेली दिसून येत नाही. जे अधिकारी काम करीत नसेल व त्यामूळे महापालिका बदनाम होत असेल तर कार्यवाही होणे आवशक आहे. लहान लहान कामाचे बिले दिली जात नाही. सहा महिने थांबावे लागते अशी परीस्थिती असेल तर योग्य नाही. एकदा बजेट तरतूद झाल्यानंतर तांत्रिक अधिकाऱ्याकडून त्या कामाची रक्कम मंजूर व्हावी. लेखा विभागाकडे जाण्याची गरज पडू नये. दुसरे असे की, मागिल सभेत झालेल्या मुद्याविषयी काय कार्यवाही केली ते विषय पत्रिकेवर यावयास पाहिजे परंतू कार्यवाही केलेली नाही. सन १९९८ मधे माजी सैनिकासाठी एक ठराव झालेला होता शासनाचा जी. आर आहे त्याची अमंलबजावणी अदयाप केलेली नाही.एक निर्णय घेणे आवशक आहे की एखादे काम केल्यानंतर किमान सात दिवसात त्या ठेकेदाराचे बिल अदा केले पाहिजे. एक कार्यपध्दती ठरविण्यात यावी.

श्री. मधुकर सावंत :विकास कामे व्हावी एवढीच विनंती आहे. बिल अदा करण्याचे काम प्रशासनाचे आहे.

श्री.संजय जोशी :विकास कामे व्हावीत अशी विनंती आहे.

डॉ. भागवत कराड :तीन महिण्यापूर्वी संबधीत अधिकारी आहे यांना सूचना दिलेल्या होत्या तरीही लाईटची कूठलीही कामे होत नाही. त्रास होत आहे. तरतूद उपलब्ध करून ही कामे होत नाही.

मा.महापौर :दोन दिवसात लाईटचे देखभाल दुरूस्तीची कामे सुरू करावी अशी सूचना मा. आयुक्त यांना देण्यात येते.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :वार्डात कोणतीही विकास कामे अदयाप झालेली नाही. केंव्हा सूरू करणार आहोत याचा खूलासा करण्यात यावा नसता मी डायस समोर बसत आहे.

(याच वेळी स. सदस्य श्री. पुरूषोत्तम ठाकूर हे मा. महापौर डायससमोर खाली बसतात.)

मा.महापौर :स.सदस्य श्री. ठाकूर यांनी आपल्या जागेवर बसावे. अधिकारी यांचेकडून खूलासा घेतला जाईल. (स.स.आपल्या जागेवर जातात.)

श्री.संजय सिरसाट :मागिल बजेटमधे जवळपास ४० कोटीच्या विकास कामांना सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. अनेक नवीन सदस्य या सभागृहात आहेत त्यांनी वार्डातील नागरीकांना दोन तीन महिण्यात विकास कामे करणे बाबत आश्वासन दिलेले आहे. अधिकारी यांनी सूध्दा लगेच कामे सुरू होतील म्हणून नगरसेवकांना आश्वासन देत आलेले आहे. ८ ते ९ महिण्याचा कालावधी गेला परंतू कोणतेही कामांना सुरूवात केलेली नसून ८० ते ९० टक्के वर्कऑर्डर देण्याचे बाकी आहे. स्थायी समितीच्या सभेत सूध्दा गेल्या वर्षभरात जे की फेब्रुवारी पर्यत ६ कोटीची कामाचे प्रस्ताव आलेले आहे.असे असेल तर उर्वरीत विकास कामाचे प्रस्ताव केंव्हा मंजूरीसाठी जाणार आहे. विकास कामाच्या संचिकेबाबत माहिती विचारली असता अधिकारी अमूक कर्मचाऱ्याकडे संचिका आहे म्हणून वारंवार सदस्यांना सांगतात. प्रत्येक पक्षाचे सदस्य त्यांचे गट नेत्याकडे जातात व कामे का होत नाही म्हणून मागणी करतात. आमच्याकडे उत्तर नसते. आताच लाईटचा विषय निघाला. लगेच अधिकारी यांनी सांगितले की दोन दिवसात कामे सूरू होतील. सदस्यांनी बोलल्यानंतरच कामे करायची आतापर्यत आदेश नव्हते असा त्याचा अर्थ होतो. ४० कोटीची तरतूद विकास कामासाठी होती तर दोन महिण्यापूर्वीच का कामे सूरू झालेली नाही. ६ कोटी व्यतिरिक्त जी कामे वार्डातील असतील ती का झालेली नाही तर वर्क ऑर्डर दयायची आहे असे सर्व सदस्यांना अधिकारी सांगतात .कोणतेही काम लेखा विभागाकडून संबधीत अधिकारी यांचेकडे जाते व त्यानंतर मा. आयुक्तांची मान्यता होवून टेंडर काढले जाते. टेंडर काही बिलो तर काही अबाऊ येते. त्यानंतर पून्हा वाटाघाटीसाठी संचिका थांबून ठेवलेली आहे असे सांगण्यात येते. माझ्या माहिती प्रमाणे एक ठेकेदार यांनी जवळपास १ कोटीच्या कामाची बुकींग केलेली आहे. अनेक कामामधे ३०,४० टक्के बिलो मधे कामे घेतलेली आहे. जर पाच लक्ष चे काम असेल तर संबधीत ठेकेदार हे दोन ते अडीच लक्ष मधे काम करतो कसे. त्या कामाची क्वॉलीटी असते का

याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे. जास्त बिलोने टेडंर भरायचे व पून्हा त्या ठेकेदारांना वाटाघाटीसाठी बोलवायचे व १० टक्के बिलोने कमी करायचे. जोपर्यत अधिकारी व संबधीत ठेकेदार यांचे संगनमत होत नाही तोपर्यत वर्क ऑर्डर दयायच्या नाहीत कामास उशीर होणे , या सर्व प्रकारामधे सर्व विकास कामे थांबून आहेत.व रिवाईज बजेट न येण्याचे कारण हेच आहे की कामे न करताच या शहराचा आम्ही विकास करीत आहोत हे प्रशासनास दाखवायचे आहे. सभागृहाच्या वतीने विनंती की ज्या ज्या कामाच्या संचिका असतील त्या संबधीत वर्क ऑर्डर हया आठ दिवसात झाल्या पाहिजे अशी विनंती आहे. तसे आदेश प्रशासनास दयावेत. एका वार्डातील १० कामे जर बजेटमधे असतील तर त्यापैकी तीन ही कामे अदयाप झालेली नाही झाली असेल तर त्या सदस्यांनी सांगावे. विकास कामे होत नाही म्हणून स. सदस्य हे डायस समोर येवून बसतात. यात सभागृहाची बदनामी होते.

मा.महापौर :७० कोटीचे बजेट विकास कामासाठी होते. आतापर्यत का खर्च होवू शकले नाही याचा किती खर्च आतापर्यत झालेला आहे याचा शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

श्री.अ.रशिद खान (मामु): लाईटचे काम किती दिवसात करणार. २ महिन्यात किती कामे होतील.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : महानगरपालिकेच्या कामकाजाची पध्दत बदलावी.

शहर अभियंता :आतापर्यत २० कोटीचे स्पील ओव्हरची कामे होती. ४० कोटीचे अंदाजपत्रक केलेले आहे. एकूण ६० कोटीचे अंदाजपत्रक आहे.१५ कोटी आतापर्यत खर्च झालेला आहे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर :या वर्षीच्या अंदाजपत्रकानूसार वार्डात किती रक्कमेची कामे केलेली आहे . केलेली नसेल तर का केलेली नाही.कामे होणार नसेल तर तसा खुलासा करावा. नागरीकांना आम्ही विकास कामे करू म्हणून वचन दिलेले आहे. वर्षभरात कोणतेही काम झालेले नाही. अधिकारी यांनी स. सदस्यांनी दिशाभूल केलेली आहे. कामे होत नसतील तर अधिकाऱ्याचे दालन बंद करू व निषेध केला जाईल. सहनशिलता संपलेली आहे.

श्री.रविंद्र गांगे :बजेट होण्याच्या अगोदर ६७(३) (सी) नुसार ४० लाखांची कामे केलेली आहे.ती करणे गरजेचे होते काय याचा खूलासा करावा.

शहर अभियंता :७२ कोटी विकास कामावर ठेवण्यात आलेले होते. यात स्पील ओव्हरची २० कोटीची कामे होती. नवीन कामाचे ४० कोटीचे अंदाजपत्रक मंजूर झालेले असून उर्वरीत १२ कोटीची जी कामे आहे त्यातील काही कामे करण्याची गरज नाही कमी करायचे आहे. काही कामाचे रक्कम वळती केलेली आहे म्हणून ती कामे करायची नाही. आतापर्यत विकास कामावर १५ कोटी खर्च झालेला असून उर्वरीत विकास कामाचे काही वर्कऑर्डर दिलेल्या आहेत काही कामे निविदा प्रोसेस मधे आहे.

श्री.सतिष कटकटे : कोणती कामे व कोणत्या भागातील वगळणार आहात ती कामे अधिकाऱ्याना

श्री. प्रल्हाद निमंगावकर    परस्पर वगळता  येतात का याचा खूलासा करावा.

मा.महापौर    :१५ कोटीची कामे झालेली आहेत. उर्वरीत २५ कोटीची कामे बाकी आहे. ती कामे केंव्हा सूरू करणार आहात याचा खूलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:गेल्या आठ महिण्यात १५ कोटीची कामे केली. एक महिण्यात २५ कोटीची कामे होतील का याचाही खूलासा होणे गरजेचे आहे.

श्री. त्र्यंबक तूपे    :१५ कोटी पैकी ६७ (३) सी नूसार किती कोटीची कामे केलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे अशा प्रकारची कामे ही तीन चार एजन्सीकडे दिली जात आहे.

श्री. कवरसिंब बैनाडे    :१५ कोटीची कामे कोणत्या वार्डात व कोणती कामे झालेली आहे याचा खूलासा करावा.

श्री. अ. रशिद खान    :टेंडर काढण्यात आले परंतू वर्क ऑर्डर केंव्हा देणार आहात याचा खूलासा करावा.

मा.महापौर    :आताच शहर अभियंता यांनी खूलासा केला की, ४० कोटीची अंदाजपत्रक व काही कामाचे टेंडर काढलेले आहे.त्यातून  १५ कोटीची कामे झालेली असून २५ कोटीची बाकी कामे केंव्हा होतील मा.आयुक्तांनी यांचा खूलासा करावा.

मा.आयुक्त    :या वर्षीच्या बजेटमधे विकास कामावर ७२ कोटीची तरतूद होती. २० कोटी स्पील ओव्हरच्या कामाचे व उर्वरीत नवीन या वर्षातील कामे होती. हा खर्च करणार असे नियोजन केले होते. ७२ कोटी पैकी ६० कोटीचे जो खर्च आहे तो बूक झालेला आहे. त्यात २० कोटी स्पीलओव्हरची व ४० कोटी  नवीन कामे आहे. आतापर्यत विकास कामावर खर्च हा १५ कोटीच झालेला आहे. २५ कोटीची जी नवीन कामे राहिलेली आहेत त्यापैकी ४० टक्के कामाच्या वर्कऑर्डर दयायचा असून ६० टक्के वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत. पूढील १० ते १५ दिवसामधे संपूर्ण कामाच्या वर्क ऑर्डर दिल्या जातील.वर्क ऑर्डर केंव्हा दिलेल्या आहेत याची लेखी माहिती स. सदस्यांना संबधीत अधिकारी देतील.

श्री. संजय सिरसाट    :६० टक्के कामाच्या वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत असे मा.आयुक्तांनी आताच म्हटले आहे.याप्रमाणे जवळपास २५ कोटीची कामे ही स्थायी समितीच्या मान्यतेसाठी जाणे आवशक होते परंतू ती स्थायी समितीकडे मान्यतेसाठी आलेली नाही.

मा.आयुक्त    :१० लक्ष रक्कमेच्या वरील कामे स्थायी समितीकडे जातील. परंतू त्या खालील रक्कमेची अनेक कामे ही माझ्या मान्यतेने कार्यवाही होते.

श्री. संजय सिरसाट    :प्रत्येक वार्डात होणाऱ्या कामाची वर्क ऑर्डर आतापर्यत दिलेली नाही. दिली असेल तर नावाचा उल्लेख करावा.

मा.आयुक्त    :वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत त्याची यादी संबधीत अधिकारी यांचे कडे आहे.४० कोटीच्या कामाची रक्कम बुक झालेली असून त्यापैकी ६० टक्के कामाच्या वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत. वार्ड निहाय माहिती आवशक असेल तर संबधीत अधिकारी स. सदस्यांना तशी माहिती देतील.

श्री.संजय सिरसाट    :माझ्या वार्डातील २५ कामे होती त्यापैकी १५ कामे ही १० लक्षच्या आतील आहे. कोणत्या कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे माहिती दयावी.

डॉ.भागवत कराड :वर्ष पूर्ण होत आहे नवीन बजेट येण्याची वेळ आलेली आहे तरी सुध्दा कामे अदयाप होत नाही. मा. सभापती यांनी म्हटले की ६ कोटीची कामे झालेली आहे. मा. आयुक्त यांनी खुलासा केला की ४० कोटीची कामे होत आहे. एकूण किती रक्कमेची कामे झालेली आहे याची माहिती लेखा विभागाकडून घेणे योग्य होईल.सर्वच सदस्यांची ही मागणी आहे की विकास कामे का होत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : किती कामे झाले हे लेखा विभाग सांगेल, परंतु २ महिन्यात कसे नियोजन केले जाईल, याचीही माहिती द्यावी.

श्री. संतोष जेजुरकर :बजेट मधे असलेली कामे होत नाही. विकास कामाच्या संचिकेला मान्यता घेण्यासाठी आम्हाला अधिकाऱ्या मागे फिरावे लागते.अधिकारी एक दुसऱ्याचे नाव दाखवतात.माझ्या वार्डातील पुर्नडाबरीकरणाचे ३ लक्ष चे काम होते. दिनांक ६.१२.२००५ रोजी मान्यता झालेली आहे. आतापर्यत वर्क ऑर्डर झालेली नाही.

मा.महापौर :मुख्य लेखाधिकारी यांनी खूलासा करावा.

प्र. मुख्यलेखाधिकारी :चालू आर्थिक वर्षासाठी विकास कामासाठी ७२.९५ कोटीची तरतूद ठेवण्यात आलेली होती. त्यापैकी २० कोटीचे स्पील ओव्हरची कामे होती. फेब्रुवारी अखेर ४०.१४ कोटीच्या विकास कामाच्या अंदाजपत्रकांना मान्यता दिलेली आहे. विकास कामाचे रू.१५.७२ कोटीचे बिल अदा केलेले आहे.

श्री. कचरू सोनवणे :औरंगाबाद शहरात झोपडपट्टी भागात विकास कामे होत नाही. अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. मा.महापौर, मा. आयुक्त यांनी भेटी देवून तेथील विकास कामे करण्याची कार्यवाही करावी.

सौ. प्रशांत देसरडा :कोणत्या नियमानूसार अशी चर्चा करता येते. खूलासा करावा.

डॉ.भागवत कराड :स्पील ओव्हरची कामे कितीझालेली आहे व नवीन कामे किती याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :नवीन कामासाठी ४० कोटीची बुकींग झालेली आहे. ६० टक्के विकास कामाच्या वर्क आर्डर दिलेल्या आहेत. ४०टक्के कामाच्या वर्क आर्डर १० ते १५ दिवसात दिल्या जातील. ४० कोटीचे कामांना मंजूरी झालेली आहे त्या कामाची यादी मा. महापौर यांना दोन तीन दिवसात दिली जाईल.

श्री.संजय सिरसाट :६० टक्के कामाच्या वर्क ऑर्डर दिल्या असे प्रशासन ठामपणे सांगत आहे परंतू कुणाच्याही वार्डात कामे सुरू झालेली नाही.

सौ.यास्मीन बेगम अ.कदीर : लोटाकारंजा भागात मटनमार्केटसाठी जे ५ लक्षचे बजेट तरतूद होती.त्यातून २.५० लक्षचे बजेट पाणीपूरवठयाच्या कामासाठी खर्च करण्यात यावे. मटनमार्केटसाठी २.५० लक्षच ठेवावे. पाण्याचा फार त्रास आहे.

मा.महापौर : लेखाशिर्ष बदलण्याची सूचना आहे तसा प्रस्ताव ठेवावा.

श्री.सिताराम सुरे :पदमपूरा येथील स.नं.१२, ५ एकर जागेचे महानगरपालिकेकडे पजेशन नाही. ३२ कोटी देत आहोत, बाजार भावाने ५० कोटी पर्यंत जाईल. ताबा घेतलेला आहे का. तारकुंपन केले का?

श्री.संतोष खेंडके :यास माझापण विरोध आहे. महानगरपालिकेने पजेशन नसतांना व न्यायालयात प्रकरण चालू असतांना बीओटी पध्दतीने कार्यवाही करण्याचे टेंडर काढले. जाहीरातीसाठी झालेला खर्चास जबाबदार कोण ? कोणाकडून वसूल करणार.

श्री.सिताराम सुरे : जय टॉवर्स,भाजी मंडई २५% विकसीत केले. या धर्तीवर याच जमिन मालकास का दिले नाही. बी.ओ.टी.वर निविदा का काढली.

मा.आयुक्त : पदमपुरा भागात प्रशासकीय इमारतीचे आरक्षण आहे. या जागेचे भूसंपादनाचा भूसंपादन अधिकारी यांनी निवाडा जाहीर केलेला आहे व आपणांस ताबाही दिलेला आहे. नंतर न्यायालयाचे स्थगिती आदेश झाले. आपला ताबा आहे. त्यामूळे निविदा काढली. कोर्टाच्या आदेशानूसार पूढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. देसरडा प्रशांत :महानगरपालिकेकडे पजेशन नाही. जमिनमालकाच्या ताब्यात जागा आहे मालमत्ता अधिकारी यांना कोणती जागा आहे हे सुध्दा माहित नाही. दाखविली तर सत्कार करू.

मा.आयुक्त :जी जागा १०,११ ऑक्टोबरला महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली आहे पंचनामा केलेला आहे. या विषयावर जास्त चर्चा करणे योग्य नाही.मा. न्यायालयात पजेशन घेतल्याचे कागदपत्र देत आहोत. पजेशन घेतले होते म्हणूनच टेंडर काढले होते.

मा.महापौर :या संदर्भात मा.न्यायालयात प्रकरण आहे. ही प्रशासकीय बाब आहे मा. आयुक्तांना जसे योग्य वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ दुपारी १.५५ वाजता पून्हा सभेला सुरूवात ३.०० वाजता).

श्री.नारायण कुचे :ओबीसी संघर्ष समितीचा विकास कामाच्या संदर्भात मोर्चा आलेला होता त्या संदर्भात चर्चा व्हावी.

श्री. संतोष खेंडके :शहर सुधार समितीचा सभापती या नात्याने सहा. संचालक नगर रचना श्री.राठोड साहेब यांनी चांगले काम केल्याबध्दल त्याचा मी सत्कार करीत आहे. मला परवानगी दयावी.

याच वेळी स. सदस्य श्री. संतोष खेडके हे संबधीत अधिकारी यांना नोटासह फुलाचा हार घालतात.

या दरम्यानच स.सदस्य श्री.अ.रशिद मामु हे अधिकाऱ्याचा अपमान होत आहे, सभागृहाचा अपमान होत आहे असे मोठमोठयाने बोलत मा.महापौर समोरील राजदंड उचलतात. व सभागृहा बाहेर जाण्याचा प्रयत्न करतात. स.सदस्य श्री. खेंडके यांचे सभासदत्व रद्य करावे अशी मागणी करतात.मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री. संजय सिरसाट :स.सदस्य श्री.अ.रशिद खान यांनी राजदंड पळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

श्री.अ. रशीद खॉन खेंडके :स.सदस्य अधिकारी यांना लाच देण्याचा प्रयत्न करीत आहे.स.सदस्य श्री. यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

याच वेळी सर्व अधिकारी सभागृहा बाहेर जातात.

मा. महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे मा. आयुक्त यांनी सभागृहाच्या बाहेर जावू नये आयुक्त हे या सभागृहाचे एक सदस्य आहेत. अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करायची ती करण्यात येईल. मा. आयुक्त सभागृहात उपस्थित आहे. आयुक्त उत्तर देण्यास सक्षम आहे. चर्चा करावी.

मा.आयुक्त : मी सभागृहाचा सदस्य नाही. सदस्यांना सभेत उपस्थित राहणे व चर्चेत भाग घेण्याचा जो अधिकार असतो तो मला आहे.

श्री.संजय जगताप :स.सदस्य श्री. संतोष खेंडके यांनी अधिकारी यांचा अपमान केलेला आहे त्यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके :स.सदस्य श्री.रशिद मामु यांनी राजदंड उचलला आहे मा. महापौर यांचा अपमान केलेला आहे त्यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

मा.उपमहापौर :अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचे व निषेध करण्याचे पूर्णपणे अधिकार या सभागृहाला आहे. परतूं आता जो प्रकार घडला तो बरोबर नाही. यामूळे महानगरपालिकेची बदनामी होईल त्यामूळे हे इतिवृत्तात येवू नये अशी विनंती आहे.

श्री. अ. रशीद खॉन :इतिवृत्तात याची संपूर्ण नोंद व्हावी. इतिवृत्तातून काढून टाकावे असे म्हणणे चूकीचे आहे.

मा.उपमहापौर :या सभागृहात नवीन सदस्य आहेत. त्यांना अंदोलनाची दिशा माहित नसेल परंतू श्री.रशिद मामु हे महापौर राहीलेले आहे. राजदंड पळविणे योग्य नाही. सर्वांनी दखल घेण्याची गरज आहे. अनेक वेळा अधिकारी कर्मचारी यांचेवर आरोप केले जाते जनतेने विकास कामासाठी येथे आपणा सर्वांना पाठविलेले आहे. हे विसरता येणार नाही. विकास कामाचे बध्दल चर्चा न होता इतर प्रकार होत राहिले तर जनता माफ करणार नाही दोन्ही बाजूनेही तोडगा म्हणून हा विषय संपवावा.

श्री. अ. रशीद खॉन : मी राजदंड घेतला नसता तर प्रकरण जास्त बिघडले असते. सभागृहात आम्ही मा. महापौर यांचा सन्मान करतो. परंतू काही सदस्य लाच देवून सभागृहात अधिकारी यांचा अपमान करीत असेल तर हा मा.महापौर व सभागृहाचा अपमान आहे.

महापौर :स.सदस्य श्री. संतोष खेंडके यांना विभाग प्रमूख श्री.राठोड यांचा सत्कार करण्याची परवानगी दिलेली नव्हती. हे सभागृह महापौर यांचे नियत्रंनाखाली चालते. अधिकाऱ्याचा सन्मान किंवा अपमान करावयाचा असेल ती जागा ही नाही. स.सदस्य श्री. संतोष खेंडके व इतर ही सर्व सदस्यांना ताकीद देण्यात येते की अशा प्रकारचे गैरवर्तन या सभागृहात यापूढे होवून नये.आता विषय क्र १ वर बोलावे.

**विषय क्र. १८५/१ :**

दिनांक २४.११.२००५,२८.११.२००५,१९.१२.२००५ व २०.०१.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. अ. रशिद खान : पान क्र ३६ वर दिनांक २०.१.२००६ च्या इतिवृत्तातील ठराव क्र १६४ हा ऐनवेळी प्रशासकीय ठराव घेतलेला आहे कडबा मंडी शिप्ट करण्याचा ठराव आहे. जागा कुठे देणार आहे या बाबतीत प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे का? असे प्रशासकीय ठराव ऐनवेळी मंजूर करणे योग्य नसून अशा ठरावाच्या प्रति स. सदस्यांना एक दिवस अगोदर मिळाल्या पाहिजे. जागा कूठे आहे पाहणी केलेली आहे काय जागा बघावी त्यानंतर यावर निर्णय घेणेत यावा. प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री.सतीश कटकटे :रविवार बाजार येथील कडबा मंडी हटविणार असे आलेले आहे तेथे महापालिकेची जागा किती आहे कडबा मंडी हटविणार की इतर ही अतिक्रमण काढणार आहात. खुलासा देण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : दिनांक २०.०१.२००६ च्या सभेतील विषय क्र.११४/३ प्रशासकीय विषय द्यावा. त्यास स्थगिता द्यावी.

मा.महापौर :या संबधी मा.आयुक्त यांचेशी चर्चा करून फिजिकल असेल तर ठिक आहे नसंता कार्यवाही होईल. विषय क्र १ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त :अतिक्रमण पूर्ण काढणार आहे. कडबा मंडीसाठी कृषि उत्पन्न बाजार समितीमधे रिजर्व जागा आहे. तेथे पूर्ण इंनटरनल रस्ते वगैरे होत आहे. तेथे शिप्ट करण्याचा प्रस्ताव आहे. आताच मा. महापौरांनी रूलीग दिल्याप्रमाणे आवशक वाटत असेल तर सदर जागेवर व्हिजीट केले जाईल. व चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. प्रकाश अत्तरदे :पान क्र ३९ वर पाणीपूरवठयासाठी जलवाहिनी टाकण्याचे प्रस्ताव या वर्षाच्या बजेटमधील रद्य करण्याचा ठराव आहे. कशाच्या अधारे रद्य केलेले आहे.

मा.महापौर :एकूण १२ कोटीची कामे कमी झालेली आहे कोणती कामे कमी झालेली आहे या संबधी मा. आयुक्त यांचेशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

दिनांक २४.११.२००५,२८.११.२००५,१९.१२.२००५ व २०.०१.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**महिला व बाल कल्याण समिती कडील प्रस्ताव**

**विषय क्र. १८६/२ :**

महिला व बाल कल्याण समिती सभा दि.२३.१२.२००५ प्रस्ताव क्र.१६ अन्वये महानगरपालिका शाळांतील बहुसंख्य मुली ४ थी नंतर शाळा सोडून देतात. त्यांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देणेसाठी महानगरपालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमातील इयत्ता ४ थीच्या शालांत परिक्षेत प्रत्येक शाळांतून अनुक्रमे प्रथम,द्वीतीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या मुलींना अनुक्रमे रू.१०००/-, रू.७५०/- व रू.५००/- रकमेची शिष्यवृत्ती देणेस मंजूरी दिली असून दिनांक

०८.०२.२००६ च्या महिला व बाल कल्याण समितीच्या सभेत विषय क्र.१९ अन्वये सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यास शिफारस केलेली आहे.

**प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.**

प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका शाळांतून आर्थिक दृष्टया कमकुवत व गरीब कुटूंबातील मूले शिक्षण घेत असतात बहुसंख्य मूली इ,४थी नंतर शिक्षण सोडून देतात त्यामूळे मुलींचे गळतीचे प्रमाण मोठे असते यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे आवशक आहे कौटुबिंक आर्थिक परीस्थितीमूळे मुलींचे शिक्षण करण्याची पालकाची माणसिकता नसते.करीता या मुलींना इ. ४ थी ते ७ वी पर्यतंच्या शिक्षणासाठी वार्षिक शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या मराठी व उर्दु माध्यमातील ई. ४ थीच्या शालांत परीक्षेत प्रत्येक महानगरपालिकातून गुणानुक्रमे प्रथम, द्विवितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या फक्त मुलींना अनुक्रमे रूपये १०००/-रूपये ७५०/- व रूपये ५००/-अशी रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरूपात देणेचा प्रस्ताव आहे.सदरील शिष्यवृत्ती धारकासाठी खालील प्रमाणे निकष असतील.

०१. शिष्यवृत्ती धारक गुणवंत विदयार्थीनिने महानगरपालिका शाळेत इ. ४ थी इ. ७ वी पर्यत शिक्षण घेणे बंधनकारक आहे. ई.४ थी परिक्षेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनीमधून प्रत्येक शाळेतून गुणानुक्रमे (मराठी, उर्दू) प्रथम तीन विद्यार्थीनींची निवड करण्यात येईल. गुणवत्ताधारक विद्यार्थीनीने कमीत कमी ६०% गुण मिळविणे आवश्यक राहील.

२. पुढील वर्षाची शिष्यवृत्ती ही त्या वर्गातील प्रवेश, उपस्थिती व प्रगती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देय राहील. याकरीता मुख्याध्यापकांनी अहवाल देणे बंधनकारक राहील.

३. शिष्यवृत्तीची रक्कम वार्षिक पध्दतीने देय राहील व सदरील रक्कम समारंभपूर्वक पालक, मुख्याध्यापक, व शिक्षक यांचे उपस्थितीत प्रदान करणेत येईल.

४. शिष्यवृत्ती योजनेचा खर्च आवर्ती असल्याने प्रतिवर्षी या योजनेसाठी रक्कम रू.७/- लाख इतकी रक्कम ठेवावी लागेल.

५. विद्यार्थीनीनी मध्येच शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यावर्षासह पुढील वर्षाची शिष्यवृत्ती देय राहणार नाही.

६. सदरील योजना प्रतिवर्षी राबवावयाची असून यासाठी लागणारा खर्च महिला व बाल कल्याण समितीच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करणेत येईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव आहे. शिष्यवृत्ती देवून शाळेच्या विदयार्थ्याचे संख्येचे गळतीचे प्रमाण थांबणार नाही. त्यासाठी शाळेचा दर्जा, शिक्षण देण्याचा दर्जा वाढविण्याची गरज आहे. त्यामूळे या ठरावास माझा विरोध आहे.

श्री.कचरू मोरे :शिष्यवृत्ती देणार आहे. परंतू १ ली ते ४ थी पर्यतच्या विदयार्थ्याचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे. काही मूलींना पूस्तकातील वाचन करता येत नाही २६ जानेवारी रोजी चावडी वाचन झाले तेंव्हा नगरसेवक या नात्याने मी उपस्थित होतो विदयार्थ्याना कोणताही पाठ वाचन करता येत नव्हते.

डॉ. भागवत कराड :ही शिष्यवृत्ती ची रक्कम एक वर्षासाठी देणे जास्तीची रक्कम नाही. शिष्यवृत्तीमूळे त्या मुलींना शिक्षणासाठी मदत होणार आहे त्यामूळे या

प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी. शैक्षणिक दर्जा का कमी होत आहे यासाठी एक समिती नियुक्त करावी. त्यात चार पाच नगरसेवकांचा समावेश तसेच एक अधिकारी असावेत. संपूर्ण माहिती घेण्यात यावी. त्यानूसार कार्यवाही करावी.

श्री. प्रशांत देसरडा :प्रस्ताव चांगला आहे परंतु आताच काही सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले त्यात चावडी वाचनामधे जो काही अनुभव आला तो अनुभव सांगितलेला आहे.मुंकुदवाडी शाळेत मी कार्यक्रमासाठी गेलो होतो तेथे चार वर्ग मिळून एक शिक्षक शिकवित होते एक मुलगा रडत होता तो का रडतो म्हणून विचारले असता त्यास जे शिक्षक शिकवितात ते शिक्षक सुट्टीवर आहे म्हणून तो रडतो आहे असे निदर्शनास आले. काही शाळेत शिक्षक असतांना त्याची शिकविण्याची इच्छा नसेल तर शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारणार नाही. त्यासाठी शिष्यवृत्ती दयायची असेल तर ती पैशाच्या स्वरूपात न देता खाजगी शाळेच्या शिक्षकाच्या माध्यमातून महापालिकेच्या शाळेत शिबीर वगैरे घेता येईल का जेणे करून तेथील शिक्षक व विदयार्थ्याचे प्रबोधन होईल . अशा प्रकारे काही उपक्रम करावे शिक्षण क्षेत्रात चांगली प्रगती होण्यासाठी या ७ लक्षचा उपयोग करावा अशी विनंती आहे.

श्री. संजय सिरसाट :यात दुरूस्ती करावी की ,दर वर्षी शेवटी एकत्रित रक्कम देण्यात येवू नये दरमहा रक्कम देण्यात यावी. हा विषय मंजूर करण्यात यावा. एकत्रित शिष्यवृत्ती रक्कम दिल्यास त्याचा गैरवापर होवू शकतो.

श्री. अ. रशीद खान :आताच स.सदस्यांनी मत मांडले की शिक्षक नाही. गुणवत्ता यादीत कोणते विद्यार्थी येतील, पेपर कोण तपासणार.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :विषय शिष्यवृत्ती देण्याचा आहे. एकत्रित रक्कम न देता. दरमहा शिष्यवृत्ती त्या विदयार्थ्यांना देण्यात यावी अशी दुरूस्ती करून प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर :विषय क्र २ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मराठी व उर्दु माध्यमातील ई.४ थीच्या शालांत परीक्षेत महानगरपालिका शाळांतून गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या फक्त मुलींना अनुक्रमे रूपये १०००/-,रूपये ७५०/- व रूपये ५००/-अशी रक्कम प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०६ च्या निकषाप्रमाणे एकत्रित रक्कम न देता, दरमहा शिष्यवृत्ती देणेत यावी,अशा दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्य कार्यालय चौक ते जुने मल्टीपरपज हायस्कुल चौक पर्यंतचा १५.० मी.रूंदीचा रस्ता महानगरपालिकेच्या टप्पा क्र.१ व ३ मधून जात असून, या रस्त्यावर नेहमीच मोठ्या प्रमाणात जड वाहतूक असल्याने कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होवून, कार्यालयीन कर्मचारी व नागरीक यांना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील रस्ता वाहतूकीसाठी कायमचा बंद करून महानगरपालिकेच्या संरक्षित भिंती पासून दक्षिण बाजूस व उत्तर बाजूस गेट टाकून महानगरपालिका परिसर एकत्र केल्यास महानगरपालिकेत येणाऱ्या नागरीकांची व कार्यालयीन कर्मचारी यांची सोयच होणार आहे. या रस्त्यावरील वाहतूकीस सर्व बाजूंनी पर्यायी रस्ते

उपलब्ध आहेत, त्यामुळे नागरीकांना रहदारीस कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तरी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. अ. रशीद खान :स्टेशन ते जिल्हाधिकारी निवास स्थान पर्यत मालमत्ता ही हायवे रोडवर आहेत.पूर्वी हे डिक्लेर झाले होते. या संबधी एनओसी मागीतली आहे. जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही अपघात होवू शकतात यामूळे दोन्ही इमारती हद्य एकत्रित करण्याचा निर्णय घेत आहोत. मुंबई येथे मंत्रालयाची सुध्दा दोन इमारती याच पध्दतीने रस्त्याच्या आमने सामने आहेत.अशा पध्दतीने कार्यवाही करणे योग्य होईल का? जी कार्यवाही होत आहे ती योग्य नाही. असे माझे मत आहे. वक्फ बोर्ड ने ही जागा त्यांचे मालकीची आहे पत्र दिले जर वक्फ बोर्डची जागा असेल तर एनओसी का घेतलेली नाही. खालच्या बाजूने वाहतूक राहिल या ठिकाणी लहानसा पूल केल्यास कर्मचारी ये-जा करतील. अशा प्रकारच्या जागा अनेक ठिकाणी दिसून येतील. आझाद कॉलेजची जागा रस्त्याच्या दोन्ही बाजूला आहे. तेथे सूध्दा रस्ता बंद होवू शकतो. या बाबतीत नागरीकाच्या सुचना हरकती मागविलेल्या आहेत का? ही कार्यवाही ठराव येण्याआधी करावयास पाहिजे. शासनाची अगोदर मान्यता घेतलेली पाहिजे तर कार्यवाही करणे योग्य होईल.

मा.महापौर :प्रस्ताव प्रशासकीय आहे. मंजूर झाल्यानंतर प्रशासन प्रशासनाच्या पातळीवर कार्यवाही करेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. कामकाज करतांना प्रशासनातील अधिकारी यांना पदाधिकारी मा. आयुक्त जेंव्हा केंव्हा बोलवितात तेंव्हा त्या इमारतीकडून वाहतूकीमूळे येण्यास वेळ लागतो अडचण येत आहे. दोन्ही इमारती हया रस्त्याच्या आमने सामने आहे. मॉयनर मॉडीफिकेशन करण्याचा सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव कुठेही पाठविण्याची गरज नाही. असे माझे मत आहे. हा रस्ता बंद केला तर जे कार्यालयात नागरीक येतात त्याचे वाहनासाठी पार्कींगची स्ववस्था नाही ती होईल. तसेच दोन ते तीन मोठमोठे गेट असून तेथे सुरक्षा कर्मचारी नियुक्त करावे लागतात त्यावर होणारा खर्च बचत होईल. कामकाज सुरळीत होण्याच्या दृष्टीने मान्यता देण्यात यावी. इतर कार्यवाही प्रशासनाने त्यांचे पातळीवर करावी. हा रस्ता महानगरपालिकेच्या मालकीचा आहे. वैयक्तिक कूणाचा असू शकत नाही. स. सदस्यांच्या ज्या भावना असतील त्या निराकरण करावे .योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अ.रशीद खान :पार्कींगसाठी जागा आवशक आहे असे म्हणणे बरोबर वाटत नाही. पार्कींगच्या जागेत सध्या लाईटचे गोडावून केलेले दिसून येईल. अशा पध्दतीचे अनेक ठिकाणी शहरात जागा दिसून येतील. सगळीकडेच अशा पध्दतीची कार्यवाही केल्यास योग्य होणार नाही. नागरीकांना त्रास होईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:हा रस्ता बंद केल्यानंतर पर्यायी रस्ता कोणता असणार आहे. जो बुढ्ढीलेन कडे जाणारा रस्ता लहान असून तो अमखास मैदान पर्यत रस्ता रूदींकरण करावे जेणे करून जनतेच्या दृष्टीने सोयीस्कर होईल. हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड :मॉयनर मॉडीफिकेशनचे असे प्रस्ताव या सभागृहात मंजूर होत असताते. हा लहान प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव महापालिकेच्या हिताचा आहे. प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे मान्यता देण्यास हरकत नसावी.महापालिकेची जागा आहे तात्काळ कार्यवाही करावी.

मा.महापौर :मा. आयुक्त यांचेशी चर्चा झालेली आहे. या बाबतीत सुचना हरकती मागवून कार्यवाही केली जाईल असे म्हटले आहे. त्यानंतरच कार्यवाही होईल. मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्य कार्यालय चौक ते जुने मल्टीपरपज हायस्कुल चौक पर्यंतचा १५.० मी.रूंदीचा रस्ता महानगरपालिकेच्या टप्पा क्र.१ व ३ मधून जाणारा रस्ता वाहतूकीसाठी कायमचा बंद करून महानगरपालिकेच्या संरक्षित भिंती पासून दक्षिण बाजूस व उत्तर बाजूस गेट टाकूण,महानगरपालिका परिसर एकत्र करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लेखाशिर्षक २००५-२००६ मधील खालील कामात बदल करणेस्तव.

०१. लेखाशिर्षक २००५ ते ०६ मधील पान न.१३० वरिल अ.क्र.४५ यामधील वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर दोन लक्ष स्मशानभूमी करीता खर्च करण्यात आला आहे. उर्वरीत बाकीचे ५०,००० रूपये वार्ड क्र.८६ येथील लाईट पोल साठी खर्च करणे बाबत.

०२. लेखाशिर्षक २००५-०६ मधील पान न.१२२ वरील अ.क्र.१४ या ऐवजी वार्ड क्र.८६ मध्ये जलवाहीनी दुरूस्ती व नविन जलवाहीनी टाकणे रूपये एक लक्ष तरी वरील कामाचे लेखाशिर्षकात बदल करण्यात यावा. यास्तव प्रस्ताव सादर.

सूचक : सौ.वंदना प्रकाश खंदारे अनुमोदक : सौ.संगिता विठ्ठलराव जाधव

मा.महापौर : मजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००५-२००६ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. लेखाशिर्ष २००५ ते ०६ मधील पान न.१३० अ.क्र.४५ वरील उर्वरित तरतूद र.रू.५०,००० वार्ड क्र.८६ येथील लाईट पोल साठी खर्च करणे.

०२. लेखाशिर्षक २००५-०६ मधील पान न.१२२ अ.क्र.१४ वरील असलेली तरतूद **याऐवजी** वार्ड क्र.८६ मध्ये जलवाहीनी दुरूस्ती व नविन जलवाहीनी टाकणे र.रू.१.०० लक्ष वळती करून लेखाशिर्ष बदलणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चेतनानगर म्हाडा कॉलनी नविन वसाहत येथे ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे या ऐवजी फुलेनगर आईच्या जागेकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुल बांधणे यासाठी (र.रू.४.०० लक्ष) लेखाशिर्ष बदलण्यात आले होते दि.१५.१२.०५ च्या सर्वसाधारण सभेत.

तथापी यात परत दुरूस्ती करून रस्त्यावर पुल बांधणे या कामाऐवजी लेखाशिर्षात पुनश्च बदल करून हर्सूल ते जकात नाकापर्यंत हायवेवर ट्युबलर पोल र.रू.४.०० लक्ष ची तरतूद लेखाशिर्षात बदल करून करणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फुलेनगर आईच्या जागेकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुल बांधणे यासाठी असलेली र.रू.४.०० लक्षची तरतूद **या कामा ऐवजी** हर्सूल ते जकात नाकापर्यंत हायवेवर ट्युबलर पोल लावणे र.रू.४.०० लक्ष असे लेखाशिर्ष बदल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,जयसिंगपुरा (मकईगेट) मकबरा रोडकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील महानगरपालिकेच्या खूल्या जागेवर छत्रपती संभाजी राजे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. या ठिकाणी संभाजी राजांचे वास्तव्य असल्याची नोंद इतिहासामध्ये आढळते. संभाजी राजांसारख्या शुर वीर व स्वाभिमानी राजांचा पुतळा या ठिकाणी उभारण्याची शहरातील व या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. या संदर्भात महापालिकेकडे अनेक वेळा निवेदने देखील दिलेली आहेत. तरी वर नमूद ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सूचक : श्री.विनायक (गणु) पांडे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्री.सतिष कटकटे

श्री. सलीम खॉन :या प्रस्तावातील जागा माझ्या वार्डात येते इतर सदस्यांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. या चौकासह रस्त्यास सय्यद हसनअली अबू नकवी असे सन २००१ मधे नाव देण्यात आलेले आहे. तेथे महापालिकेची पाच इंच ही खुली जागा दिसून येणार नाही. पुतळा बसविण्यास माझा विरोध नाही. ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांनी त्याचे वार्डात पुतळा बसविण्याची कार्यवाही करावी. या चौकापासून मस्जीद ५० फुटाच्या अंतरावर आहे. शहराचे वातावरण खराब करण्याचा प्रयत्न आहे असे वाटते. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येवू नये.

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय : दुसऱ्याच्या वार्डात नगरसेवकाने प्रस्ताव ठेवला आहे. स.श्री.विनायक पांडे यांच्या वॉर्डात प्रस्ताव ठेवावा.

श्री.संजय जगताप :आम्ही संभाजी महाराज यांचा आदर करणारे आहोत. विषय क्र ६ च्या संदर्भात कमेटी नियुक्त करावी. संबधीत नगरसेवकांना विश्वासात घेवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री. विनायक पांडे : विचारपूर्वक प्रस्ताव ठेवला आहे. सदर ठिकाणी महापालिकेची २००० हजार स्क्वेअर फुट जागा आहे. त्या जागेवर पुतळा बसवावे. जयसिंगपूरा,

पहाडसिंगपूरा, बेगमपूरा व शहरातील सर्व जनतेचा अस्मितेचा प्रश्न आहे. १९७८ पासूनची नागरीकांची मागणी आहे. मस्जीदच्या बाजूला शहरात अनेक ठिकाणी पूतळे आहेत. मस्जीदचे कारण पूढे करणे योग्य नाही. याचा मी निषेध व्यक्त करतो. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करावा ही विनंती.

श्री.दत्तभाऊ पाथ्रीकर :सभागृहात वाद निर्माण होतील असे प्रस्ताव येवू नये. विकास कामाचे प्रस्ताव यावे असे मी मागच्या बैठकीतच म्हटले होते. शहरात अनेक ठिकाणी वाहतूकीस अडथळे आणणारे पूतळे बसविण्यात आलेले आहे ते सर्व पुतळे एकत्रित ठिकाणी करण्याचे प्रयोजन करावे. हैद्राबाद मध्ये सर्व महापुरूषाचे पुतळे एकत्रित ठिकाणी आहे. त्या पध्दतीने या शहरातही कार्यवाही व्हावी. त्यात या पुतळ्याचाही विचार व्हावा.महापालिकेची जेथे जागा असेल ती शहर विकासात्मक कामासाठी वापरण्यात यावी. उदया सभागृहाचे नाव बदलण्याचा ठराव येईल. ही पध्दत बंद करावी. शहराचे वातावरण चांगले रहावे यासाठी सर्वांनीच प्रयत्नशील असावे.

सौ.लता दलाल :पुतळा उभारल्यामूळे वाद होतील राजकारण होतील हे शब्द सदस्यांकडून बोलले जावेत हे अपेक्षीत नाही इतिवृत्तातून हे शब्द काढून टाकावे.हा वार्ड माझा आहे असा प्रश्न येत नाही. आज त्या वार्डाचे सदस्य अमूक असतील पुढच्या वेळेस दुसरे सदस्य असतील. तेथे महापालिकेची जागा आहे. त्या भागात संभाजी महाराज वास्तव्य होते.महापालिकेचे क्षेत्र अबाधीत आहे त्यामूळे सदर पूतळा त्या ठिकाणी होण्याची जी मागणी केली केली ती अवाजवी नाही. शहरात अनेक पर्यटक येत असतात. एका मस्जीद जवळ संभाजी महाराज यांचा पुतळा होत असेल तर ही अभिमानस्पद बाब आहे. या ठरावास एकमताने मान्यता दयावी.

श्री. सलीम खॉन :तेथे अगोदरच रस्ता लहान आहे. पुतळा उभारल्यानंतर वाहतूकीस अडचण होईल. बजेटमध्ये या वार्डसाठी सौदयीकरणासाठी चार लक्षची तरतूद केलेली आहे.

मा.उपमहापौर :थोर पूरूष हे सर्वाचेच असतात ते कूणाचे वारस नसतात.

श्री.अ. रशीद खान :शहरात चार ठिकाणी चौकास व काही ठिकाणी संभाजी महाराज यांचे नाव दिलेले आहसंभाजी महाराज यांचा पूतळा सिडको टी. व्ही सेन्टर येथे बसविण्यातही आलेला आहे. अली मिया नदवी हे मोठे थोर व्यक्ती होते. त्यांचे नावाचे या रस्त्याचे सौदयीकरण होणार आहे. रस्त्याचे काम होत आहे. जर नाव बदलण्यात येत असेल तर योग्य होणार नाही. ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असेल तर संपूर्ण कागदपत्र महापालिकेकडे आहे का? याचाही खूलासा घ्यावा.

श्री. सलीम खॉन :महापालिकेची तेथे जागा नाही. मास्टर प्लॅननूसार१०० फुट रस्ता रूदींकरण होणार आहे.या प्रस्तावास मान्यता देण्यात येवू नये.

मा.महापौर : विषय क्र.६,७ व पुरवणीचे सर्व विषय मंजूर. ऐनवेळचे प्रस्ताव विषय क्र.१,२ दुरूस्तीसह मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र.३ पुढील बैठकीमध्ये ठेवण्यांत

यावा. विषय क्र.४ ते ७ मंजुर करण्यात येत आहे. व ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयसिंगपुरा (मकईगेट) मकबरा रोडकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील महानगरपालिकेच्या खूल्या जागेवर छत्रपती संभाजी राजे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.३१ येथे नागरिकांना पाण्याचा अत्यंत त्रास असल्यामूळे येथे पाण्याची सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी मटन मार्केट सुधारीत अर्थसंकल्पामधून र.रू.२,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार फक्त) वॉटर सप्लायमध्ये वर्ग करण्यात यावा, ही विनंती. मटन मार्केटचे कामापेक्षा पाण्याच्या सप्लायचे काम होणे जास्त गरजेचे असल्याने हे काम लवकरात लवकर व्हावे. लोटाकारंजा,मोमीनपुरा परिसरात मोठी जलवाहीनी टाकून नागरीकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.यास्मीन अक्रम — अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३१ येथे नागरीकांना पाण्याची सोय करणेसाठी, अर्थसंकल्पात मटन मार्केटसाठी असलेली रक्कम रू.२,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार फक्त) पाणी पुरवठ्यामध्ये वर्ग करून लोटाकारंजा,मोमीनपुरा परिसरात मोठी जलवाहीनी टाकून नागरीकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : ऐनवेळचे प्रस्ताव विषय क्र १,२ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे. विषय क्र.३ पुढील बैठकीमध्ये ठेवण्यात यावे,विषय क्र ४ ते ७ मंजूर करण्यात येत आहे.

## पुरवणी विषय

**विषय क्र. १९२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१८ पवननगर सिडको येथील वार्डात चालू आर्थिक वर्षातील बझेटमध्ये पाण्याच्या पाईप लाईन साठी १५ लक्ष रूपये ठेवले आहेत पैकी १० लक्ष रूपये पवननगर वार्डातील विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरणासाठी बदलून देण्यात यावेत, हि विनंती.

सूचक : श्री.प्रकाश अत्तरदे — अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पामध्ये वार्ड क्र.१८ पवननगर सिडको पाण्याच्या पाईप लाईन साठी असलेली र.रू.१५.०० लक्षची तरतूदीपैकी र.रू.१०.०० लक्ष पवननगर वार्डातील विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरणासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/२ :**

मनपा प्रा.शाळा किराडपुरा न.२ ही शाळा खाजगी जागेत असून या शाळेमध्ये फरशी, स्वच्छतागृह इत्यादीचा त्रास असून भिंतींना जागोजागी तडे गेले असून पत्रे देखील गळत आहे. हि शाळा

स्लम भागात असून विद्यार्थी संख्या देखील भरपूर आहे. विजेची सोय नसून पाण्याची देखील व्यवस्था नाही. इमारत खाजगी असल्याने मनपातर्फे देखभाल-दुरूस्तीचे काम देखील होवू शकत नाही. या भागात जवळपास मनपाची कोणतीही इमारत आणि खूली जागा नसल्याने शाळेचे स्थलांतर करणे अशक्य आहे. करिता शरीफ कॉलनी प्रभागातील खाजगी मालमत्ता संपादन करून मनपा प्रा.शाळा किराडपुरा न.२ या ठिकाणी स्थलांतर करण्यात यावी. या शाळेसाठी खाजगी मालमत्ता संपादन करून शाळा सुरू करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सर्वसाधारण सभेत सादर.

सूचक : श्री.निसार खॉन मो.खॉन अनुमोदक : श्री.हिम्मतराव साळूबा दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्रा.शाळा किराडपुरा न.२ या शाळेसाठी शरीफ कॉलनी प्रभागातील खाजगी मालमत्ता संपादन करून मनपा प्रा.शाळा किराडपुरा न.२ या ठिकाणी स्थलांतर करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात औरंगाबाद महानगरपालिका हद्दीसाठी सध्या दोन विकास योजना अंमलात असून सिडको अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या भागासाठी देखील विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेने इरादा जाहीर केलेला आहे. त्याचप्रमाणे शिवाजीनगर हा भाग नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याबाबत शासनस्तरावर अधिसूचनाही प्रसिध्द झालेली आहे. या भागासाठी देखील विकास योजना तयार करावी लागणार आहे. औरंगाबाद महानगरपालिका वाढीव हद्दीसाठी विकास योजना दि.१९/११/१९९१ला मंजूरझालेली असून या विकास योजनेची अंमलबजावणी ही सुमारे १% ही झालेली दिसत नाही. सदर विकास योजनेतील बीड वळण रस्त्यालगतचा व पैठण रस्त्या लगतचा भाग काही प्रमाणात विकसीत झालेला असून इतर हद्दीमध्ये मागील १५ वर्षात विकास वाढीचा दर हा नगण्य आहे. आज शहराची लोकसंख्या सुमारे ११ लाखापर्यंत झालेली असून विकास योजनेप्रमाणे मुंबई रस्त्याच्या बाजूने पडेगांव मिटमिटा, हर्सूल भागात व चिकलठाणा भागात अधिकृत विकास झालेला नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता शहरात जास्तीत जास्त दोन विकास योजना रहाव्यात व प्रशासकीयदृष्ट्या कामकाजावर नियंत्रण ठेवता यावे, यासाठी दिनांक १९/११/१९९१ ला मंजूर झालेली विकास योजना सुधारीत करण्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे. वाढीव हद्दीच्या विकास योजना सुधारीत करण्या बरोबरच सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळलेल्या भागासाठी व शिवाजीनगर या नव्याने समाविष्ट होणाऱ्या भागासाठी अशी सर्वांची मिळून एकच विकास योजना तयार करणे योग्य ठरेल. तरी आता वाढीव हद्दीची सुधारीत विकास योजना तयार करण्यासाठी व शिवाजीनगरचा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर त्या हद्दीची त्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम -१९६६ चे कलम २३ अन्वये इरादा जाहीर करणे व वाढीव हद्दीची सुधारीत विकास योजना सिडको अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या भागासाठी तसेच महानगरपालिका हद्दीत समाविष्ट होणारे शिवाजीनगर व इतर भागासाठी आणि महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या भागसाठी विकास योजना तयार करण्याचे काम शिल्लक राहिले आहे, अशा सर्व भागासाठी एकत्रित विकास योजना तयार करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात जास्तीत जास्त दोन विकास योजना रहाव्यात व प्रशासकीयदृष्ट्या कामकाजावर नियंत्रण ठेवता यावे, यासाठी दिनांक १९/११/१९९१ ला मंजूर झालेली विकास योजना सुधारीत करणे व वाढीव हद्दीच्या विकास योजना सुधारीत करण्या बरोबरच सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळलेल्या भागासाठी व शिवाजीनगर या नव्याने समाविष्ट होणाऱ्या भागासाठी अशी सर्वांची मिळून एकच विकास योजना तयार करणेस आणि वाढीव हद्दीची सुधारीत विकास योजना तयार करण्यासाठी व शिवाजीनगरचा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर त्या हद्दीची त्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम -१९६६ चे कलम २३ अन्वये इरादा जाहीर करणे व वाढीव हद्दीची सुधारीत विकास योजना सिडको अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या भागासाठी तसेच महानगरपालिका हद्दीत समाविष्ट होणारे शिवाजीनगर व इतर भागासाठी आणि महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या भागसाठी विकास योजना तयार करण्याचे काम शिल्लक राहिले आहे, अशा सर्व भागासाठी एकत्रित विकास योजना तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/४ :**

मराठवाडाच नव्हे तर लगतच्या खानदेश आणि विदर्भातील गोरगरीब गरजू रूग्णांचे आशास्थान बनलेले औरंगाबाद शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय (घाटी रूग्णालय) यंदा सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. हे रूग्णालय आपल्या शहरात असल्यामुळे साहजिकच त्याचा लाभ शहरातील गोरगरीब रूग्णांना मोठ्या प्रमाणावर होत असतो. महापालिकेच्या आरोग्य सेवेवर पडणारा मोठा भार घाटी रूग्णालयामुळे कमी झाला आहे, हे सत्य नाकारता येणार नाही.

रूग्णसेवेची अविरत ५० वर्ष पूर्ण केलेल्या या घाटी रूग्णालयाच्या संदर्भात शहरवासियांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महानगरपालिकेचेही काही कर्तव्य आहे. रूग्णालयातील रूग्णसेवेसाठी आवश्यक असलेले फर्निचर उदा.कॉट, बेडसाईड लॉकर, पेशंट ट्रॉलीज इत्यादी जुने असल्याने ते बदलणे गरजेचे झाले आहे. रूग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ.विणा पाटील यांनी या संदर्भात म.न.पा.कडे मदतीची अपेक्षा केलेली आहे. घाटी रूग्णालयाचे शहरवासीय गोरगरीब रूग्णांच्या संदर्भातील योगदान लक्षात घेऊन घाटीतील वर उल्लेखिलेल्या नवीन फर्निचरसाठी महानगपालिकेतर्फे २० लाख रूपये मदत देऊन रूग्णसेवेतील आपला वाटा उचलण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशीनाथ कोकाटे

अनुमोदक: श्री.भगवान घडमोडे, श्री.संजय शिरसाट,श्री.तरविंदरसिंग धिल्लन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय (घाटी रूग्णालय) यंदा सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्यामूळे, रूग्णालयातील रूग्णसेवेसाठी आवश्यक असलेले फर्निचर उदा.कॉट, बेडसाईड लॉकर, पेशंट ट्रॉलीज इत्यादी जुने असल्याने ते बदलणेसाठी महानगपालिकेतर्फे र.रू.२०.०० लाखाची मदत देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

## स्थायी समिती सभेकडील प्रस्ताव

**विषय क्र. १९६/१ :**

दिनांक 14/2/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्रमांक 222 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये सन 2006-2007 या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यासंबंधीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावावर स्थायी समिती सभेत विचार विनिमय होऊन खालील प्रमाणे दुरुस्त्यासह प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

प्रस्तावातील अनुक्रमांक २) निवासी, स्वतः अथवा भाड्याने वापर करणाऱ्या मिळकतींसाठी विभाग निहाय वाजवी भाड्याचा प्रशसनाने प्रस्तावित केलेले दर व स्थायी समितीने शिफारस केलेले दर प्रती माह चौ.मी. पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | बांधकामाचा प्रकार | प्रशासनाने प्रस्तावीत केलेले दर | स्थयी समितीने शिफारस केलेले दर | प्रशासनाने प्रस्तावीत केलेले दर | स्थयी समितीने शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | | ब | |
| 1 | **अ-** आर.सी.सी. | रू.14/- | रु.12.5 | रू.12/- | रु.11.00 |
| 2 | **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | रू.12/- | रु.11.00 | रू.10/- | रु.09.00 |
| 3 | **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | रू.10/- | रु.09.00 | रू.08/- | रु.07.00 |
| 4 | **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | रू.05/- | रु.04.50 | रू.03/- | रु.02.50 |

शहरातील मंदीर, मस्जीद, चर्च, गुरुद्वारा इत्यादीसाठी पुर्वीप्रमाणेच कुठल्याही प्रकारचे कर आकारण्यात येणार नाही.

समाजमंदीर, अनाथालय, वृध्दाश्रम, महिला सुधार केंद्र तत्सम जे धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आहेत त्यांना सामान्य करात अनुज्ञेय सुट देय राहील.

प्रस्तावातील अ.क्र.6 मध्ये कोणत्याही मिळकतीच्या ओपन रुफ टेरेससाठी कोणत्याही प्रकारची मालमत्ता कराची आकारणी करता येणार नाही.

प्रस्तावातील अ.क्र. 7 मध्ये 20 टक्के ऐवजी 50 टक्के सूट राहिल.

प्रस्तावातील अ.क्र.8 मध्ये सामान्य करात 100 टक्के सुट आणि त्यासोबतच महानगरपालिकेस मिळणाऱ्या करात सुट देय राहिल. परंतु शासनाकडे जे कर भरावे लागणार आहेत ते देय राहतील.

सदर मालमत्ता कराची आकारणी 1 एप्रिल 2006 नंतर नवीन आकारणी करण्यात येणाऱ्या सर्व मिळकतींना लागू राहिल. सिडको भागाचे हस्तांतरण झाल्यानंतर मालमत्ता कर आकारताना ज्या वर्षी घराचे बांधकाम झालेले आहे त्यावेळची आधारभूत किंमत धरुन कर आकारण्यात यावा.

वरील दुरुस्त्यासह सर्वसाधारण सभेपुढे पाठवण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

## प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 नुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीवर मालमत्ता कर आकारण्यात येतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका आणि अधिनियमातील अनुसूचित प्रकरण 8 कराधान नियम (Tax Rule ) मधील नियम क्रमांक 7 मध्ये नमुद केल्या प्रमाणे मिळकतीचे वाजवी अंदाजे भाडे विचारात घेऊन कर पात्र रक्कम ठरविली जाते. त्यानुसार औरंगाबाद शहराचे मनपा हद्यीतील मिळकतीवर सन 2006-2007 साठी निवासी, बिगर निवासी मोकळ्या जमीनी / बखळ जमीनीचे वाजवी भाड्याचे दर माह प्रती चौ.मी.ला विभाग निहाय दर निश्चित करणे आवश्यक आहे. मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 9 व कलम 99 अन्वये महानगरपालिकेने दि.20-2-2006 रोजी किंवा त्यापूर्वी

निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन 2006-07 या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित केलेले आहे.

**सध्या अस्तित्वात असलेले दर हे खालील प्रमाणे आहेत.**

| इमारतीचे बांधकामचा वर्ग व तपशिल | अपेक्षित मासिक भाडयाचा दर | |
|---|---|---|
| | निवासी प्रती चौ.मी. | निवासेत्तर प्रती चौ.मी. |
| **अ-** आर.सी.सी. | 9.50 | 22.60 |
| **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | 7.20 | 18.50 |
| **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | 6.30 | 13.00 |
| **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | 3.10 | 09.60 |

वरील दर पाहता औरंगाबाद शहरातील मिळकतीसाठी सारखेच आहेत. मिळकत हर्सुल मध्ये असो किंवा शहराच्या मध्य वस्तीत गुलमंडी येथे असो ह्यात शहराच्या विकासानुरूप मिळकत दर असणे आवश्यक आहे. शहराचे अविकसीत भाग व विकसीत भागातील वस्त्या मधील मालमत्तांना कर आकारणी करतांना सध्या सारख्याच दराने होते ही विसंगती दूर करतांना दरात बदल करणे आवश्यक आहे. ह्यासाठी मिळकतींचे दरा नुसार मिळकतींची वर्गवारी ठरविणे आवश्यक होते. त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे सन 2006-07 चे शिध्द शिघ्र गणकातील मिळकत दरानुसार शहरातील मिळकतींची वर्गवारी 05 विभागात करण्यात आली आहे.

1) औरंगाबाद मनपा हद्दीतील सर्व मिळकतींसाठी पाच विभाग पुढील प्रमाणे करणेचे प्रस्तावित आहे. खालील नमुद केल्या प्रमाणे विभागासाठी शिध्द शिघ्र गणकातील दिलेल्या दरा नुसार अ, ब, क, ड व ई असे पाच भाग होतात. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेत ठेवण्यात येतील.

| अ.क्र. | विभाग | निवासी जागांची किंमत प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| 1 | अ | रू.11,000/- पेक्षा जास्त |
| 2 | ब | रू.9500 ते रू.10,999/- |
| 3 | क | रू.8000 ते रू.9499/- |
| 4 | ड | रू.6500 ते रू.7999/- |
| 5 | ई | रू.6499 पेक्षा कमी |

सध्या शहरातील कर आकारणी करतांना निवासी / निवासेत्तर मिळकतींना प्रत्यक्ष भाडे पाहून / अपेक्षित भाडे यानुसार कर आकारणी केली जाते. त्यात बऱ्याच वेळा संबंधित मिळकतधारक भाडेकरू दाखवित नाही. त्यामुळे मनपाचे आर्थीक नुकसान होते. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदी नुसार अपेक्षित भाड्यावर कर आकारणी करणे योग्य होईल.

ह्या पाच विभागातील मिळकतींना कर आकारणी करतांना त्यांच्या वर्गवारी नुसार त्यांचे दर अपेक्षित भाडे काढण्यासाठी हे खालील प्रमाणे असतील.

**२) निवासी स्वतः अथवा भाड्याने वापर करणाऱ्या मिळकतींसाठी विभाग निहाय वाजवी भाड्याचा दर प्रती माह चौ.मी.असा प्रस्तावित करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | अ | ब | क | ड | ई |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **अ-** आर.सी.सी. | रू.14/- | रू.12/- | रू.10/- | रू.09/- | रू.8.50/- |
| 2 | **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | रू.12/- | रू.10/- | रू.08/- | रू.06/- | रू.04/- |
| 3 | **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | रू.10/- | रू.08/- | रू.06/- | रू.04/- | रू.02/- |
| 4 | **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | रू.05/- | रू.03/- | रू.1.50/- | रू.1.25/- | रू.01/- |

**3)** निवासेत्तर स्वतः अथवा भाड्याने वापर करणाऱ्या मिळकतींचा वाजवी भाड्याचा दर प्रतिमहा प्रती चौ.मी.दर प्रस्तावित करत आहे.

| अ.क्र. | प्रकार | अ रूपये | ब रूपये | क रूपये | ड रूपये | ई रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **अ-** आर.सी.सी. | 36 | 30 | 25 | 23 | 21 |
| 2 | **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | 30 | 25 | 20 | 15 | 10 |
| 3 | **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | 25 | 20 | 15 | 10 | 5 |
| 4 | **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | 15 | 7.50 | 3.75 | 3.10 | 2.50 |

**4)** शहरातील मोकळ्या जमीनीच्या कर आकारणी सध्या त्याचे सध्याचे मुल्यांकनानुसार मुल्य काढुन त्याचे 5% एवढे कर योग्य मुल्य रक्कम ठरविण्यात येत. ह्यात बऱ्याचवेळा बांधीव क्षेत्रास येणाऱ्या करापेक्षा मोकळ्या जागेचा कर जास्त येतो ही विसंगती आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी तसेच मोकळ्या जागा निवासी / बिगर निवासीसाठी वापरात असतात म्हणुन त्या वापरानुसार त्याचे वाजवी भाड्याचे दर खालील प्रमाणे प्रती चौ.मी.प्रती माह दर प्रस्तावित करत आहे.

| अ. क्र. | बांधकामाचा प्रकार | अ | ब | क | ड | ई |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | केवळ मोकळ्या जागा / निवासी पार्कींग / बखळ | रू.1.40/- | रू.1.20/- | रू.1.00/- | रू.0.90/- | रू.0.85/- |
| 2 | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेला मोकळ्या जमीनी | रू.5.60/- | रू.4.80/- | रू.4.00/- | रू.3.60/- | रू.3.40/- |
| 3 | बिगर निवासी पार्कींग | रू.2.80/- | रू.2.40/- | रू.2.00/- | रू.1.80/- | रू.1.70/- |

**5)** निवासी / बिगर निवासी, मोकळ्या जागांच्या वापरात बदल झाल्यास किंवा क्षेत्रात वाढ / बदल झाल्यास किंवा भाडेकरू वापरात बदल झाल्यास त्या मिळकतींची कर आकारणी विभाग निहाय वरील अनुक्रमांक 1 ते 4 मधील सुधारीत वाजवी भाड्याच्या दर माह प्रती चौ.मी.दरा प्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

**6)** औरंगाबाद शहराचा विकास पाहता औरंगाबाद मनपा हद्यीतील सर्व निवासी, बिगर निवासी मिळकतींच्या मोकळ्या गॅलरी / बाल्कनी / टेरेस (Open to sky) क्षेत्रासाठी अद्यापपावेतो कर आकारणी करण्यात आलेली नाही. ती करणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकारचे क्षेत्र (Super builtup ) बांधकाम म्हणुन विकले जाते. मिळकतधारक हे विकत घेतात. तरी अशा प्रकारचे क्षेत्राची आकारणी निवासी / बिगर निवासी वाजवी भाड्याच्या दर माह प्रती चौ.मी.च्या दराच्या 50% दराने विभाग निहाय करण्याचे प्रस्तावित आहे.

**7)** औरंगाबाद मनपा हद्यीतील बांधकाम व्यावसायीक ग्रुप हाऊसींग स्किमला बढावा देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते की, सामान्य करात ग्रुप हाऊसिंग स्किमला 20% सूट देण्यात यावी. कारण ग्रुप हाऊसिंग मध्ये आंतरीक विकास पूर्णतः विकासकाने करायचा असतो. तसेच अंतर्गत रस्ते खुली जागा इतर सर्व सुविधा त्यांनीच देखभाल दुरूस्ती करावयाची असते. यापूर्वी मनपाला विकासासाठी तसेच त्या विकास कामाची देखभालासाठी काही खर्च येत नाही. म्हणुन ह्या प्रकारच्या ग्रुप हाऊसिंग मधील घरांना मालमत्ता कर आकारणी करतांना सामान्य करात 20% सुट देणेचे प्रस्तावित करत आहे.

**8)** औरंगाबाद मनपा हद्यीतील निवासी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांसाठी विशेष बाब म्हणुन मनपातर्फे त्यांच्या निवासी वापरातील त्याच्या नावावर असलेली एक मिळकतीवरील मालमत्ता करातील सामान्य करात 100% सुट त्यांच्या किंवा त्यांच्या पत्नी ह्यात असे पर्यंत देणेचे परंतु त्यांचे वारसदारांना सूट लागु राहणार नाही असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महानगरपालिकेने प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी न करता स्वतःचे वापरातील निवासी / निवासेत्तर वापर ग्राह्य धरून अपेक्षित भाडे काढणेचे ठरविल्यास खालील प्रमाणे कर आकारणी करणे योग्य होईल. करीता खालील दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**महापालिकेचे दर**

| अ.क्र | करांचे नांव | सन 2005-06 | | सन 2006-07 | |
|---|---|---|---|---|---|
| | | कर योग्य मुल्य | दर | कर योग्य मुल्य | दर |
| 1 | सामान्य कर | 1 ते 1000 | 23% | 1) निवासी वापराच्या सर्व कर योग्य मुल्यावर | 30% |
| | | 1000 ते 10000 | 24% | | |
| | | 10001 ते 20000 | 25% | | |
| | | 20001 ते 50000 | 30% | 2) बिगर निवासी वापराच्या सर्व कर योग्य मुल्यावर | 45% |
| | | 50001 ते 100000 | 34% | | |
| | | 100001 ते पुढे | 36% | | |
| 2 | साफसफाई कर | अ) निवासी | 3% | 1) निवासी | 3% |
| | | ब) निवासेत्तर<br>1) 1 ते 50000<br>2) 50001 ते पुढे | 8%<br>10% | 2) निवासेत्तर कोणत्याही कर योग्य मुल्यावर | 10% |
| 3 | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | 1% | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | 1% |
| 4 | अग्निशमन कर | | 1.5% | | 1.5% |
| 5 | मनपा शिक्षण कर | | 2% | | 2% |
| 6 | पथकर | | 2% | | 2% |
| 7 | जललाभ कर | | 1.5% | | 1.5% |
| 8 | जलनिस्सारण कर | | 1.5% | | 1.5% |

मोकळ्या जागेवरील कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल.

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णया प्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करीता, वरील प्रमाणे दर निश्चिती करून अमंलबजावणी दि.1-4-2006 पासून करणेच्या मान्यतेस्तव सादर. करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.अ.रशिद खान (मामु) : याबाबत मा.महापौर यांना अंतिम करण्याचे अधिकार देण्यांत यावे.

श्री.संजय शिरसाट : मा.महापौरांना सर्वांच्या वतीने अंतिम करण्याचे अधिकार देण्यास सहमती आहे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये सन २००६-२००७ या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता कराचे दर निश्चीत करण्यासंबंधी खालीलप्रमाणे दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

1) औरंगाबाद मनपा हद्यीतील सर्व मिळकतींसाठी पाच विभाग प्रस्तावित केलेले आहे. त्याऐवजी खालील नमुद केल्याप्रमाणे विभागासाठी शिध्द शिघ्र गणकातील दिलेल्या दरा नुसार अ, ब, क, ड असे चार भाग करण्यात

येतात. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ.क्र. | विभाग | निवासी जागांची किंमत प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| 1 | अ | रू.11,000/- पेक्षा जास्त |
| 2 | ब | रू.9500 ते रू.10,999/- |
| 3 | क | रू.8000 ते रू.9499/- |
| 4 | ड | रू.7999/- पेक्षा कमी |

**२) निवासी स्वतः अथवा भाड्याने वापर करणाऱ्या मिळकतींसाठी विभाग निहाय वाजवी भाड्याचा दर प्रती माह चौ.मी.प्रस्तावित दरात खालीलप्रमाणे दूरूस्तीसह मंजुर करण्यांत येत आहे.**

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **अ-** आर.सी.सी. | रू.9.50/- | रू.8.50/- | रू.7.50/- | रू.6.50/- |
| 2 | **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | रू.7.50/- | रू.07/- | रू.6.50/- | रू.5.50/- |
| 3 | **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | रू.6.50/- | रू.06/- | रू.05/- | रू.3.50/- |
| 4 | **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | रू.04/- | रू.2.50/- | रू.1.25/- | रू.1.00/- |

**3)** निवासेत्तर स्वतः अथवा भाड्याने वापर करणाऱ्या मिळकतींचा वाजवी भाड्याचा दर प्रतिमहा प्रती चौ.मी. प्रस्तावित दरात दुरुस्ती करुन खालीलप्रमाणे मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | प्रकार | अ रूपये | ब रूपये | क रूपये | ड रूपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **अ-** आर.सी.सी. | 24 | 22 | 20 | 21 |
| 2 | **ब-** गोलपटाव, लाकडी लोखंडी पत्रासह छत | 20 | 18 | 16 | 14 |
| 3 | **क-** लोखंडी / सिमेंट पत्रे मंगलोर टाईल्स छत | 18 | 16 | 14 | 8 |
| 4 | **ड-** सिमेंट धातुचे पत्रे किंवा थॅचडरूफींग (बांबुचे तट्टर) | 16 | 6.00 | 3.25 | 3 |

**4)** शहरातील मोकळ्या जमीनीच्या कर आकारणी सध्या त्याचे सध्याचे मुल्यांकनानुसार मुल्य काढुन त्याचे 5% एवढे कर योग्य मुल्य रक्कम ठरविण्यात येत. ह्यात बऱ्याचवेळा बांधीव क्षेत्रास येणाऱ्या करापेक्षा मोकळ्या जागेचा कर जास्त येतो ही विसंगती आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी तसेच मोकळ्या जागा निवासी / बिगर निवासीसाठी वापरात असतात म्हणुन त्या वापरानुसार त्याचे वाजवी भाड्याचे दर खालील प्रमाणे प्रती चौ.मी.प्रती माह प्रस्तावित दरात दुरुस्ती करुन मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| 1 | केवळ मोकळ्या जागा / निवासी पार्कींग / बखळ | रू.1.20/- | रू.1.00/- | रू.0.80/- | रू.0.70/- |

विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी आणि बिगर निवासी पार्कींग या संदर्भात प्रशासनाकडे पुनर्विचारासाठी परत पाठविण्यांत येते.

**7)** औरंगाबाद मनपा हद्दीतील बांधकाम व्यावसायीक ग्रुप हाऊसींग स्किमला बढावा देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते की, सामान्य करात ग्रुप हाऊसिंग स्किमला 20% सूट देण्यात येते. अंतरीक विकास जोपर्यंत विकासक स्वत करेल तोपर्यंत ही सुट देय राहील. ज्यावेळी महानगरपालिकेतर्फे देखभाल दुरुस्ती व साफसफाईची कामे करण्यांत येतील. तेंव्हा ही 20 टक्के करातील सुट देय राहणार नाही.

**8)** औरंगाबाद मनपा हद्दीतील निवासी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांसाठी आणि माजी सैनिकासाठी विशेष बाब म्हणुन मनपातर्फे त्यांच्या निवासी वापरातील त्याच्या नावावर असलेली एक मिळकतीवरील मालमत्ता करातील

सामान्य करात 100% सुट त्यांच्या किंवा त्यांच्या पत्नी हयात असे पर्यंत देणेचे परंतु त्यांचे वारसदारांना सूट लागु राहणार नाही या दुरुस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

वरील दुरुस्त्यासह प्रस्तावित मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती कडील प्रस्ताव**

**विषय क्र. १९७/२ :**

दिनांक ०४.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सभेतील प्रस्ताव क्र.४ अन्वये ३८ शिक्षण सेवकांना वेतनश्रेणीमध्ये नियूक्ती देणे आणि यापुढे ज्या ज्या शिक्षकांचे जात प्रमाणपत्र वैध होवून येतील त्यांना देखिल वेतनश्रेणीमध्ये नियूक्ती देण्यांत यावी, या दुरूस्तीसह मंजुरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाकडून प्राप्त झालेला मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मार्च २००२ मध्ये ३८ शिक्षण सेवकांना नियुक्ती देण्यात आली होती. शासन निर्णय क्र.पी.आर.ई.२००३/१३३३० (३४७२) प्रा.शि.-१ शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई -३२. दि.९.४.२००३ अन्वये शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांची तीन शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदरील नियुक्त केलेल्या ३८ शिक्षण सेवकांना वेतन श्रेणीमध्ये नियुक्ती देणे आवश्यक आहे. परंतु ९ शिक्षण सेवकांची जात प्रमाणपत्र वैध होऊन अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांना वेतनश्रेणी देणे स्थगित ठेवून खालील दर्शविलेल्या शिक्षण सेवकांना आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून वेतन श्रेणी रूपये ४५०० ते ७००० ही वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

| अ. क्र. | शिक्षण सेवकांचे नांव | प्रथम नेमणूक दिनांक | ३ वर्ष पूर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री तडवी हुसेन नजीर | १५.३.२००२ | १४.३.२००५ |
| ०२ | श्री घायाळ रामदास आसाराम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०३ | श्री बर्डे भरत विष्णू | १५.३.२००२ | १४.३.२००५ |
| ०४ | श्रीमती पवार ज्योतीबाला रामा | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| ०५ | श्री कांबळसुनिल कुमार काशीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०६ | श्री सोळूंके भगवान मोतीराम | १४.३.२००२ | १३.३.२००५ |
| ०७ | श्रीमती शेळके शैलजा संभाजी | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| ०८ | श्री ताठे तुषार संपत | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| ०९ | श्रीमती पाटील अनिता शामराव | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| १० | श्रीमती किटे अनिता नामदेवराव | २३.३.२००२ | २२.३.२००५ |
| ११ | श्रीमती श्रेष्ठ रिता गोपीनाथराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १२ | श्रीमती निकम मंगल देवराव | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १३ | श्रीमती वैष्णव हेमा राधेश्याम | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १४ | श्री अब्दुल अजीम अ.करीम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |
| १५ | श्री शेख महमंद अलिम म.आजम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्रीमती मारावार अलका लक्ष्मीनारायण | ९.३.२००२ | ८.३.२००५ |
| १७ | श्रीमती शिंदे मंगल पुंडलीकराव | १३.३.२००२ | १४.३.२००५ |
| १८ | श्रीमती निमगांवकर विजयालक्ष्मी बी. | ७.३.२००२ | १३.३.२००५ |
| १९ | श्री घुले सुदर्शन शिवाजी | १३.३.२००२ | ५.४.२००५ |
| २० | श्रीमती तायडे आम्रपाली त्र्यबंक | ९.३.२००२ | १४.६.२००५ |
| २१ | श्रीमती शिंदे वृषाली माणिकराव | १४.३.२००२ | १८.४.२००५ |
| २२ | श्रीमती पुरी आशा भिमराज | १४.३.२००२ | ७.४.२००५ |
| २३ | श्री झुंजूरडे धनराज सिताराम | १८.३.२००२ | १७.३.२००५ |
| २४ | श्री उबाळे शशीकांत मोहन | १५.३.२००२ | १७.३.२००५ |
| २५ | श्रीमती माळी रोहिण रंगनाथ | ८.३.२००२ | १९.६.२००५ |
| २६ | श्री. राहाणे केदार सोमीनाथ | ८.३.२००२ | ७.३.२००५ |
| २७ | श्री निवालकर गणेश भानुदास | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २८ | श्रीमती रशिदा उन्नीसा अ.युसूफ | ११.३.२००२ | १०.३.२००५ |
| २९ | श्रीमती कुर्ले विजया सुदाम | १३.३.२००२ | १२.३.२००५ |

वरिल प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्र.पी.आर.ई.२००३/१३३३० (३४७२) प्रा.शि.-१ शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई -३२. दि.९.४.२००३ अन्वये शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांची तीन शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदरील नियुक्त केलेल्या ३८ शिक्षण सेवकांना वेतन श्रेणीमध्ये नियुक्ती देणे आवश्यक आहे. परंतु ९ शिक्षण सेवकांची जात प्रमाणपत्र वैध होऊन अहवाल प्राप्त झालेला नाही. प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २९ शिक्षण सेवकांना आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून वेतन श्रेणी रूपये ४५०० ते ७००० ही वेतनश्रेणी देण्यास आणि यापुढे ज्या ज्या शिक्षकांचे जात प्रमाणपत्र वैध होवून येतील, त्यांना देखिल आदेश निर्गमित झालेल्या तारखेपासून प्रास्तावित वेतन श्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पालिका आयुक्त यांचेकडिल प्रस्ताव

**विषय क्र. १९८/३ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे की, क्रांतीचौक येथे जालना रोडवर मराठवाडा एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून उड्डाणपुल बांधणे बाबत नियोजीत आहे.

क्रांतीचौक येथे जालना रोडमध्ये असलेल्या वाहतूक बेटात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. क्रांतीचौक येथे बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलाची लांबी अंदाजे ८०० मी. एवढी असून रूंदी २० मी.एवढी आहे. क्रांतीचौक येथे उड्डाणपुल उभारण्या संदर्भात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे तीन संकल्पचित्रे (Proposal) सादर करण्यात आलेली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

**पर्याय क्र.१**

शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याखालून भुयारी मार्ग बांधणे.

**पर्याय क्र.२**

शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याच्या एका बाजूस उड्डाणपुल बांधणे.

**पर्याय क्र.३**

शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या स्थितीत ठेवून पुतळ्याच्या दोन्ही बाजूस उड्डाणपुल बांधणे.

वरील तिन्ही पर्यायापैकी एक उत्तम पर्याय निवडणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : पुढील सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १९९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सावरकर चौक ते एस.बी.कॉलेज (व्हाया) निरालाबाजार रस्त्याचे सौंदर्यीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.७७,८१,९३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात महानगरपालिका शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरील कामातील रू.३७,८१,९३०/- मार्च अखेर खर्च अपेक्षित आहे. उर्वरित खर्च सन २००६-२००७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात येईल. तरी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सावरकर चौक ते एस.बी.कॉलेज (व्हाया) निरालाबाजार रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या रक्कम रू.७७,८१,९३०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या कामाचा खर्च सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील महानगरपालिका शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातील र.रू.३७,८१,९३०/- मधून करणेस व उर्वरित खर्च सन २००६-२००७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इन्स्टीट्युट ऑफ हाऊसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दि.११ ते १९ मार्च २००६ रोजी चायना व थायलंड येथे आर्थिक व्यापकता आणि दारिद्रय निर्मूलन (Economic Libralization and Poverty Alleviation) कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यशाळेस मा.महापौर,मा.सभापती-स्थायी समिती यांना निमंत्रित केले असून सदर कार्यशाळा लोकप्रतिनिधी व अधिकारी संवर्गासाठी आयोजित केलेली आहे.

सदर कार्यशाळेसाठी मा.महापौर,मा.उप-महापौर,मा.सभापती,स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.आयुक्त आणि मा.महापौरांनी नियूक्त केलेले एक अधिकारी जाणार आहे. सदर कार्यशाळेत भौतिक सुविधा व घरबांधणीसाठी निधी उपलब्ध करणे, कार्यक्षमता वाढविणे योग्य पध्दतीचे नियोजन करणे, आर्थिक सुधारणा इत्यादी बाबत देखील प्रशिक्षण व तेथील विविध प्रकल्पांना भेटी देखील देण्यात येणार आहे. सदर कार्यशाळेसाठी निवास, भोजन व प्रवास ह्या अनुषंगाने होणारा खर्च प्रती व्यक्ती सुमारे ३.०० लक्ष रूपये अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे मा.पदाधिकारी, अधिकारी यांना या कार्यशाळेत भाग घेण्यासाठी खर्चास मान्यता देणेस व राज्य शासनाची परवानगी घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ११ ते १९ मार्च २००६ रोजी चायना व थायलंड येथे आर्थिक व्यापकता आणि दारिद्रय निर्मूलन (Economic Libralization and Poverty Alleviation) या विषयावर इन्स्टीट्युट ऑफ हाऊसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेतर्फे आयोजीत आंतरराष्ट्रीय कार्यशाळेस जाणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेचे मा.महापौर,मा.उपमहापौर, मा.सभापती (स्थायी समिती), मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा.आयुक्त आणि मा.महापौर यांनी नियूक्त केलेल्या एका अधिकाऱ्यास जाण्यास आणि या कार्यशाळेसाठी येणारा प्रवास,निवास,भोजन व इतर र.रू.३.०० लक्ष प्रती व्यक्ती खर्चास आणि सदर कार्यशाळेस राज्य शासनाची आवश्यक ती परवानगी घेवून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मानपुरा येथे बचत भवनासाठी (संत एकनाथ रंगमंदिरासाठी) वाहनतळाची आवश्यकता लक्षात घेता ह्यापुर्वी विषय क्रमांक ठराव क्रमांक २०/२ दिनांक १७/०६/२००५ नुसार खालील प्रमाणे ठराव मंजूर झाला होता.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावाच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मौजे उस्मानपुरा येथील बचत भवनासाठी (संत एकनाथ रंगमंदिरासाठी) या ठिकाणी विद्यमान २६९ चौ.मी. वाहनतळासाठी जागा उपलब्ध होत असल्याने प्रस्तावात नमूद केलेले दोन भूखंडाची आवश्यकता नसल्याने समोरील भागातील म्हणजेच दक्षिणेकडील भूखंड न.भू.क्र.१४४८८/१ क्षेत्र २३०.६० चौ.मी. जागा संपादन करण्यास आणि या संपादीत होणाऱ्या जागेवर तळमजल्यावर कार पार्कीग व वरच्या मजल्यावर दुचाकी वाहनासाठी वाहनतळाची व्यवस्था करण्याकरीता न.भू.क्र.१४४८८/१ क्षेत्र ५३०.६० चौ.मी.संपादन करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

उपरोक्त ठरावामध्ये खालील प्रमाणे फेरबदलास व सोबत जोडलेल्या पार्कीगच्या संकल्पनेबाबत मंजूरी व्हावी.

१. संत एकनाथ रंग मंदिरासाठी वाहनतळाची आवश्यकता लक्षात घेता न.भू.क्र.१४४८८/१ चे भूखंड धारकास भूखंडामागील ४.५० मी.ची Service Lane ही चालु सन २००६ चे बाजार मुल्य नुसार विकत देणे व संबंधीतानी भूखंडा सोबत Service Lane चा भाग एकत्रीकरण करून प्रस्ताव दाखल करणे.
२. तसेच संत एकनाथ रंग मंदिराच्या पश्चिम बाजुकडील अस्तित्वातील रस्त्यातील दक्षिणेकडील ३०.५X३ मीटर जागा ही नगर भूमापन क्रमांक १४४८८/१ च्या भूखंड धारकास विकत देणे तसेच न.भू.क्र. १४४८८/१ च्या भूखंडामागील Service Lane मधील १७.६५X४.५० मीटर जागा ही संबंधीतास विकत देणे.

रंगमंदिराच्या पश्चिमेकडील संरक्षित भिंत तोडून ती भिंत ३.०० मीटरने पश्चिमेकडे स्थलांतरीत करणे व दक्षिण-पश्चिम बाजुच्या सामासिक अंतरातील तिकीटघर काढुन आवश्यकतेनुसार स्थलांतरीत करणे ही कामे नगर भूमापन क्रमांक १४४८८/१ च्या भूखंड धारकाकडून करून घेणे .

३. मंजूर ठरावानुसार नगर भूमापन क्रमांक १४४८८/१ चे संपूर्ण क्षेत्र ५३०.६० चौ.मी. जागा संपादीत करून तळमजल्यावर कार पार्कींग व वरच्या मजल्यावर दुचाकी वाहनव्यवस्था करणेऐवजी सदरील भूखंडाच्या प्रस्तावित इमारतीच्या फक्त तळघरामध्ये पश्चिमेकडील सामासिक अंतरासह पार्कींग करणे व भूखंड धारकाच्या प्रस्तावित इमारतीसाठी समोरील सामासिक अंतरात वाहनतळासाठी सवलत देणे व तळघरातील वाहनतळासाठी सदर भूखंडाच्या दक्षिणेकडील बाजुच्या मध्यातून पोच रस्ता देऊन बाहेर जाण्याचा मार्ग हा सदर भूखंडाच्या उत्तरेकडील Service Lane मार्गे देण्यात येईल, जेणे करून वाहने ही सदर Service Lane द्वारे पुर्वेकडून उत्सव मंगल कार्यालयाचे पूर्व बाजूलगतच्या मुख्य रस्त्यावर जातील म्हणजेच नगर भूमापन क्रमांक १४४८८/१ हा संपूर्ण संपादीत करण्याऐवजी त्या भूखंडाच्या प्रस्तावित इमारतीचे तळघर हे संत एकनाथ रंगमंदिराच्या पार्कींगसाठी भूखंडधारकाकडून बांधून घेणे.

४. नगर भूमापन क्रमांक १४४८८/१ च्या भूखंड धारकास तळघरातील वाहनतळाच्या बांधकमासाठी येणारा खर्च व संत एकनाथ रंग मंदिराची पश्चिमेकडील संरक्षित भिंत स्थलांतरीत करण्यासाठी येणारा खर्च व संत एकनाथ रंग मंदिराची पश्चिमेकडील संरक्षित भिंत स्थलांतरीत करण्यासाठी येणारा खर्च असा एकूण खर्च काढून त्या खर्चापोटी भूखंडा मागील Service Lane चा मावेजा व संत एकनाथ रंग मंदिराच्या पश्चिमेकडील रस्त्यातील ३०.५X३ मीटरचा मावेजा यामध्ये प्रस्तावित भूखंडावरील इमारतीच्या बांधकाम परवानगीसाठी येणारा खर्च जसे बांधकाम परवानगी फी, बांधकाम परवानगीसाठी लागणारी अनामत रक्कम, विकास खर्च, जमीन विकास शुल्क (एकत्रिकरणासाठी) आणि शहर विकास निधी इत्यादी समायोजित करून घेणे व भूखंड धारकास बांधकाम परवानगी देणे इत्यादीसाठी नोंदणीकृत करारनामा करून घेण्यात येईल.

सर्वसाधारण सभा दिनांक १७/०६/२००५ मध्ये विषय क्रमांक २०/२ च्या ठरावास दिलेल्या मान्यतेनुसार व उपरोक्त बदल मान्य असल्यास भूखंड धारक १४४८८/१ यांना त्यांच्या भूखंडा मागील Service Lane व रंगमंदिराच्या पश्चिमेकडील ३०.५X३ मीटर जागा विकत देणे बाबत कार्यवाही व संत एकनाथ रंग मंदिराच्या पश्चिमेकडील अस्तित्वातील संरक्षित भिंत स्थलांतरीत करणेसाठी येणाऱ्या खर्चाबाबत मा.शहर अभियंता यांच्या विभागाकडून तपासणी करण्यात येईल व वाहनतळ चालविण्यासाठी संबंधीत विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अ.क्र १ ते ५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजूरी देण्यात येते तसेच सर्वसाधारण सभा दिनांक १७.६.२००५ प्रस्ताव क्र २०/२ ठरावाच्या मान्यतेप्रमाणे प्रास्तावित बदल न.भू.क्र १४४८८/१ चे भूखंड धारकांस मान्य असल्यास त्यांच्या भूखंडा मागिल सर्व्हीसलेन, रंगमंदीराच्या पश्चिमेकडिल ३०.५ × ३ मीटर जागा विकत देणे व संत एकनाथ रंगमंदीराच्या पश्चिमेकडील विद्यमान संरक्षीत भिंत स्थलांतरित करण्यासाठी येणारा खर्चाबाबत शहर अभियंता विभागाकडून तपासणी करण्यास व वाहनतळ चालविण्यासाठी संबधित विभागाकडून कार्यवाही करण्यास सर्वानूमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेने विषय क्र.१५७/३ दिनांक २०/०१/२००६ च्या ठरावा अन्वये सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी सिडको प्राधीकरण औरंगाबाद महानगरपालिकेस रू.१५.०० कोटी देणार असुन ही रक्कम घेण्याचे मान्य करून हस्तांतरण करून घेण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

दिनांक ११/०२/२००६ रोजी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक औरंगाबाद दौऱ्यावर आले असता त्यांच्याबरोबर हस्तांतरणाच्या दृष्टीने चर्चा झाली या चर्चेमध्ये असे ठरले की, दिनांक १ एप्रिल २००६ रोजी सिडको भागाचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेण्याच्या दृष्टीने करावयाच्या करारनाम्यावर दिनांक १ मार्च २००६ रोजी स्वाक्षरी करण्यात यावी असे ठरले.

सिडको औरंगाबाद अधिसुचित क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे त्या भागासाठी खालील सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे.

१. विद्युत व्यवस्था देखभाल व दुरूस्ती.
२. जलनि:सारण व्यवस्थेअंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे कामे करणे.
३. सिडको भागातील स्वच्छतेची कामे करणे (साफसफाई व फवारणी करणे)
४. सिडको भागातील इमारतींना बांधकाम परवानगी देणे/भोगवटा प्रमाणपत्र देणे.
५. आरोग्य सेवा पुरविणे.
६. अतिक्रमण रोखणे.
७. रस्त्याची कामे करणे.
८. उद्यानाची देखभाल दुरूस्ती करणे.
९. मालमत्ता कर आकारणी करून कराची वसुली करणे. इत्यादी कामे करणे.

उपरोक्त सेवा सुविधा पैकी , (१) विद्युत व्यवस्था देखभाल व दुरूस्ती (२) जलनि:सारण व्यवस्थेअंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे कामे करणे (३) उद्यानाची देखभाल दुरूस्ती करणे (४) सिडको भागातील स्वच्छतेची कामे करणे (साफसफाई व फवारणी करणे) ही कामे सिडको तर्फे वार्षीक देखभाल दुरूस्तीच्या निविदा काढून हाती घेण्यात येतात त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेस उपरोक्त सेवा सुविधा पुरविण्यासाठी सिडको प्रमाणेच या कामाच्या वार्षिक देखभाल दुरूस्तीच्या निविदा काढाव्या लागणार आहेत.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १ एप्रिल २००६ पासुन उपरोक्त सेवा सुविधा महानगरपालिका देणार असल्यामुळे त्या सेवा सुविधा पुरविण्यासाठी सिडको प्रमाणेच वार्षिक देखभाल दुरूस्तीच्या निविदा काढण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको औरंगाबाद अधिसुचित क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे त्या भागासाठी प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ९ प्रमाणे सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे. अ.क्र.१ ते ९ या सेवा सुविधा पैकी , (१) विद्युत व्यवस्था देखभाल व दुरूस्ती (२) जलनि:सारण व्यवस्थेअंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे कामे करणे (३) उद्यानाची देखभाल दुरूस्ती करणे (४) सिडको भागातील स्वच्छतेची कामे करणे (साफसफाई व फवारणी करणे) ही कामे सिडको तर्फे वार्षीक देखभाल दुरूस्तीच्या निविदा काढून

हाती घेण्यात येतात, त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेस उपरोक्त सेवा सुविधा पुरविण्यासाठी सिडको प्रमाणेच दिनांक १ एप्रिल २००६ पासुन या कामाच्या वार्षिक देखभाल दुरूस्तीच्या निविदा काढण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०३/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६७ व वार्ड क्र.६८ अंतर्गत मो.विष्णुनगर येथील नाल्यास नाला संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००४-०५ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रक रक्कम रूपये २८,९९,८००/- होत आहे. सदरील काम महानगरपालिका अर्थसंकल्प २००५-०६ मधील नाला ट्रेनिंग या लेखा शिर्षातील पान क्र.१८७ अ.क्र.९,१६ व १७ वरील तरतूदीचे एकत्रिकरण करून एकत्रीत रक्कम रूपये २९,००,०००/- उपलब्ध झाल्यानुसार त्यामधून प्रस्तावीत आहे. सद्यस्थितीत सदरील नाल्यामध्ये विविध ठिकाणी अतिक्रमण असून, प्रत्यक्ष काम सुरू करण्यापूर्वी नगर रचना विभागाकडून नाल्याची आखणी करून घेवून व अतिक्रमण काढून घ्यावे लागेल, तद्नंतर प्रत्यक्ष काम करता येईल. सदरील कामाचे अंदाजपत्रकास दिनांक ०३.०२.२००६ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ व वार्ड क्र.६८ अंतर्गत मो.विष्णुनगर येथील नाल्यास नाला संरक्षित भिंत बांधणे या कामाचे रक्कम रूपये २८,९९,८००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानि कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०४/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२७ पान क्र.१५१२ अ.क्र.१०५, बाबर कॉलनी, नाहीद नगर येथे रस्ते दुरूस्त करणे व पुन्हा डांबरीकरण करणे रू.४,००,०००/- (अक्षरी चार लाख फक्त) २.प्रभाग क्र.२७ पान क्र.१६३ अ.क्र.०८,वार्ड क्र.२७ मध्ये विहीरीचा गाळ काढून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, रूपये २,५०,०००/- (अक्षरी दोन लाख पन्नास हजार फक्त)

३. प्रभाग क्र.२७ पान क्र.१६५ अ.क्र.७६,वार्ड क्र.२७ येथील जिवेश्वर कॉलनी येथे जलवाहीनी टाकणे रूपये ४,००,०००/- (अक्षरी चार लाख फक्त)

सदरील रक्कम १०,५०,०००/- (अक्षरी दहा लाख पन्नास हजार रूपये फक्त) वरील कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद ठेवण्यात आली होती. परंतू काही कारणामूळे सदरील काम होवू शकत नाही. तरी सदरील रक्कम रू.२,००,०००/- (अक्षरी दोन लाख फक्त) म.न.पा.विद्युत विभागातर्फे कटकट गेट ते पोलीस मेस पर्यंत टूवे सोडीयम लाईट दुरूस्त करणे, बदलण्यासाठी व देखभाल दुरूस्तीसाठी ही रक्कम खर्च करण्यात यावे आणि प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथील विविध ठिकाणचे पथदिवे चालू करणे व बदलण्यासाठी रू.१,००,०००/- खर्च करण्यात यावे व उरलेली ७,५०,०००/- पोलीस मेसच्या पाठीमागे नाल्याची संरक्षित भिंत बांधण्यासाठी खर्च करण्यात यावी, कारण मागच्यावेळी अतिवृष्टी झाल्यामूळे कित्येक लोकांच्या घरात पाणी शिरले होते, त्यामूळे तेथील नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले होते,

तरी सदरील रक्कम ही संरक्षित भिंत बांधण्यासाठी उपयोगात आणावे, ही विंनती.

सूचक : सौ.अजरा जबीन मसुद खान

अनुमोदक : १. श्री.तरविंदरसिंग धिल्लन, २.श्री.अश्रफ मोतीवाला, ३. श्री.हाजी शेर खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पात प्रभाग क्र.२७ साठी पान क्र.१५१२ अ.क्र.१०५, पान क्र.१६३ अ.क्र.०८ व पान क्र.१६५ अ.क्र.७६ वरील कामासाठीची एकत्रीत र.रू.१०,५०,०००/- (अक्षरी दहा लाख पन्नास हजार रूपये फक्त) **याऐवजी** रक्कम रू.२,००,०००/- (अक्षरी दोन लाख फक्त) कटकट गेट ते पोलीस मेस पर्यंत टूवे सोडीयम लाईट दुरूस्त करणे/बदलणे व देखभाल दुरूस्तीसाठी व प्रभाग क्र.२७ शताब्दीनगर येथील विविध ठिकाणचे पथदिवे चालू करणे व बदलण्यासाठी रू.१,००,०००/- तसेच उर्वरीत र.रू.७,५०,०००/- पोलीस मेसच्या पाठीमागे नाल्याची संरक्षित भिंत बांधण्यासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अ.क्र.६५/पान क्र.१८३ भिमनगर,भावसिंगपूरा ड्रेनेज लाईन अप्ग्रेटींग करणे तसेच अ.क्र.५० पान क्र.१३३ भिमनगर भावसिंगपुरा येथील म.न.पा.च्या खूल्या जागा विकसीत करणे या दोन्ही कामावरील तरतूद (२+१५०) ३५० लक्ष भिमनगर भावसिंगपुरा, येथील स्मशान भूमीच्या रस्त्याचे काँक्रीट करण करणे व पुलाची उंची वाढविणे या कामाकरिता वापरणे तसेच अ.क्र.७२/ पान क्र.१८३ भिमनगर भावसिंगपुरा जूनी ड्रेनेज लाईन काढून नविन टाकणे यावरील रूपये ३.०० लक्षची तरतूद भिमनगर येथे समाज मंदिर बांधण्यासाठी वापरावी, हि विनंती.

सूचक : श्री.मिलिंद दाभाडे — अनुमोदक : श्री.दिलीप गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प अ.क्र.६५ पान क्र.१८३ तसेच अ.क्र.५० पान क्र.१३३ वरील कामासाठी असलेली तरतूद **याऐवजी** र.रू.३.५० लक्ष भिमनगर भावसिंगपुरा, येथील स्मशान भूमीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे व पुलाची उंची वाढविणे तसेच र.रू.३.०० लक्ष भिमनगर येथे समाज मंदिर बांधण्यासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०६/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१४२ वर अ.क्र.५२ नुसार प्र.क्र.९६ अंतर्गत नविन डांबरी रस्ते या कामाकरिता रू.४.०० लक्षची तरतूद करण्यात आली असून सदर कामा ऐवजी लेखाशिर्ष बदल करण्यात येवून प्र.क्र.९६ अंतर्गत सिल्कमिल कॉलनी धनगरवाडा येथे पुर्न:डांबरीकरणच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतूद रू.३.०० लक्ष मध्ये उपरोक्त रू.४.०० लक्षची तरतूद वळती करण्यात यावी व सदर कामांसाठी वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सूचक : सौ.मोमीन सफिया फिरदोस

अनुमोदक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन, श्री.सलीम खान, सौ.अजरा जबीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१४२,अ.क्र.५२ वरील प्रभाग क्र.९६ साठीच्या कामाकरीता असलेली र.रू.४.०० लक्षची तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून **त्याऐवजी** प्र.क्र.९६ अंतर्गत सिल्कमिल कॉलनी धनगरवाडा येथे पुर्न:डांबरीकरणच्या कामासाठी

उपलब्ध असलेल्या तरतूद रू.३.०० लक्ष मध्ये उपरोक्त रू.४.०० लक्षची तरतूद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०७/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१४२ वर अ.क्र.५२ नुसार प्र.क्र.९६ अंतर्गत नविन डांबरी रस्ते या कामाकरिता रू.४.०० लक्षची तरतूद करण्यात आली असून सदर कामा ऐवजी लेखाशिर्ष बदल करण्यात येवून प्र.क्र.९६ अंतर्गत सिल्कमिल कॉलनी धनगरवाडा येथे पूर्न:डांबरीकरणच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतूद रू.३.०० लक्ष मध्ये उपरोक्त रू.४.०० लक्षची तरतूद वळती करण्यात यावी व सदर कामांसाठी वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सूचक : सौ.मोमीन सफिया फिरदोस अनुमोदक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन,श्री.सलीम खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात पान क्र.१४२ अ.क्र.५२ वरील प्रभाग क्र.९६ साठीच्या कामाकरीता असलेली र.रू.४.०० लक्षची तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून **त्याऐवजी** प्रभाग क्र.९६ अंतर्गत सिल्कमिल कॉलनी धनगरवाडा येथे पूर्न:डांबरीकरणच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतूद रू.३.०० लक्ष मध्ये उपरोक्त रू.४.०० लक्षची तरतूद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०८/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.रविकिरण राजाभाऊ कुलकर्णी हे महानगरपालिका अस्थापनेवर गेल्या सात वर्षापासून दै.वेतनावर एम.पी.डब्ल्यु. पदावर कार्यरत असून सन २००४ डिसेबंर पासून प्रशासनातर्फे त्यांच्याकडून प्रभारी स्वच्छता निरीक्षक पदाचे काम करून घेण्यात येत आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता ही स्वच्छता निरिक्षक पदासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेनुसारच असल्याने त्यांचे पदनाम बदलून त्यांना दैनिक वेतनावर स्वच्छता निरिक्षक या पदावर नियूक्ती देणे संदर्भाने पदनाम बदलणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : अ.रशिदखान (मामू)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.रविकिरण राजाभाऊ कुलकर्णी हे महानगरपालिका अस्थापनेवर गेल्या सात वर्षापासून दै.वेतनावर एम.पी.डब्ल्यु. पदावर कार्यरत असून सन २००४ डिसेबंर पासून प्रशासनातर्फे त्यांच्याकडून प्रभारी स्वच्छता निरीक्षक पदाचे काम करून घेण्यात येत असल्यामूळे, त्यांची शैक्षणिक पात्रता ही स्वच्छता निरिक्षक पदासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेनुसारच असल्याने त्यांचे पदनाम बदलून त्यांना दैनिक वेतनावर स्वच्छता निरिक्षक या पदावर नियूक्ती देणेस व पदनाम बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०९/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, युनूस कॉलनी येथील खूली जागा विकसीत करणे या कामासाठी ठेवण्यात आलेल्या पृष्ट क्र.१९९ अ.क्र.९ वरील तरतूदी मधून ७५,०००/- रू.चे काम झालेले आहे. यामधील उर्वरीत ३,००,०००/- रू.ची तरतूदीमधून २,००,०००/- ड्रेनेज देखभाल दुरूस्तीसाठी आणि १,००,०००/- विद्युतीकरणासाठी (सोडीयम व्हेपर फिटींग) वळती करण्यात यावी.

त्याचप्रमाणे सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१९९ आणि अ.क्र.२२ वरील ''नेहरूनगर वार्डातील विहीर स्वच्छ करून विद्युत पंप बसविणे'' या कामासाठी असलेली तरतूद नेहरूनगर प्रभागात विविध ठिकाणी विद्युतीकरण करण्यासाठी वळती करण्यात यावी. दोन्ही लेखाशिर्षामधील बदल करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक : सौ.मेहेरउन्नीसा हमीदखान अनुमोदक : श्री.रशिदखान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१९९ अ.क्र.९ वरील उर्वरीत र.रू.३.०० मधून र.रू.२.०० लक्ष ड्रेनेज देखभाल दुरूस्तीसाठी आणि आणि १,००,०००/- विद्युतीकरणासाठी (सोडीयम व्हेपर फिटींग) वळती करणेस, तसेच सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१९९ आणि अ.क्र.२२ वरील तरतूद नेहरूनगर प्रभागात विविध ठिकाणी विद्युतीकरण करण्यासाठी वळती करून लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१०/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.मिटमिटा/पडेगांव येथे विहिरीवर मोटार बसविण्याच्या कामाकरीता र.रू.४.०० लक्ष ची तरतूद अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये करण्यात आलेली आहे. परंतू सदरील कामाऐवजी मो.मिटमिटा /पडेगांव येथे मुंबई रोडवर स्ट्रीट लाईट बसविण्याचा किंवा विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट लावण्यासाठी हेड बदल्याचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन

अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे, श्री.मुजीब आलम खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मिटमिटा/पडेगांव येथे विहिरीवर मोटार बसविण्याच्या कामाकरीता अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये र.रू.४.०० लक्षची असलेली तरतूद **याऐवजी** मो.मिटमिटा /पडेगांव येथे मुंबई रोडवर स्ट्रीट लाईट बसविणे किंवा विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट लावण्यासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/१६ :**

औरंगाबाद महानगरपालिका अधिसूचीत सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे लवकरच हस्तांतरण होणार आहे. सिडको भागाचे हस्तांतरण करून घेण्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेने विषय क्र.१५७/३ दिनांक २०.०१.२००६ नुसार मान्यता दिलेली आहे.

सिडको भागाचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर महानगरपालिकेतर्फे त्या भागास मुलभूत सेवा सुविधा द्याव्या लागणार आहे. सिडको भाग साधारण १ एप्रिल २००६ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होईल असे गृहीत धरण्यात आले आहे. हस्तांतरणानंतर खालील सुविधा महानगरपालिकेस द्याव्या लागतील.

०१. विद्युत व्यवस्था देखभाल व दुरूस्ती.

०२. जलनि:सारण व्यवस्थे अंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे काम करणे, ज्या जलनि:सारण वाहिन्या सिडकोतर्फे महानगरपालिकेच्या जलनि:सारण वाहिन्यास जोडलेल्या आहेत, त्या मलनि:सारण प्रक्रीया केंद्रापर्यंत नेणे.

०३. इमारतींची व उद्यानांची देखभाल व दुरूस्ती करणे.

०४. रस्त्यांची कामे करणे.

०५. सिडको भागात इमारतींना बांधकाम परवानगी देणे/भोगवटा प्रमाणपत्र देणे.

०६. सिडको भागातील सॅनेटिशनचे काम करणे.

०७. आरोग्य सेवा पुरविणे.

०८. अतिक्रमण रोखणे.

०९. मालमत्ता कर आकारणी करून, कराची वसूली करणे.

उपरोक्त संदर्भाने कामे करण्यासाठी सध्या अस्तित्वातील औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे तातडीने काही पदे निर्माण करून त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे. म्हणजे मान्यता प्राप्त पदे महानगरपालिकेतर्फे भरून सिडको भागातील नागरीकांना नागरी सेवा सुविधा देता येतील.

करीता सिडको भागातील सेवा सुविधा देण्यासाठी महानगरपालिकेस खालीलप्रमाणे संवर्ग निहाय कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | संवर्ग | वेतन श्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | कार्यकारी अभियंता | १०६५०-१५८५० | ०१ |
| ०२. | उप अभियंता | ८०००-१३५०० | ०४ |
| ०३. | वैद्यकीय अधिकारी तथा घन कचरा व्यवस्थापक | ८०००-१३५०० | ०१ |
| ०४. | सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण विभाग) | ७४५०-११५०० | ०१ |
| ०५. | लेखाधिकारी | ७४५०-११५०० | ०१ |
| ०६. | कनिष्ठ अभियंता | ५५००-९००० | १२<br>(४ विद्युत व ८ स्थापत्य) |
| ०७. | कार्यालयीन अधिक्षक | ५५००-९००० | ०४ |
| ०८. | प्रमुख लेखापाल | ५५००-९००० | ०२ |
| ०९. | दुय्यम आवेक्षक (इमारत निरिक्षक) | ४५००-७००० | १६ |
| १०. | विद्युत पर्यवेक्षक | ४५००-७००० | ०८ |
| ११. | स्वच्छता निरिक्षक | ४५००-७००० | ०४ |
| १२. | वरिष्ट लिपीक | ४५००-७००० | १२ |
| १३. | कनिष्ट लिपीक | ३०५०-४५९० | ३५ |
| १४. | पशुधन पर्यवेक्षक | ४०००-६००० | ०२ |
| १५. | सहाय्यक उद्यान अधिक्षक | ४०००-६००० | ०१ |
| १६. | एम.पी.डब्ल्यु. | ४०००-६००० | १० |
| १७. | एस.एफ.डब्ल्यु. | ४०००-६००० | १० |
| १८. | संगणक ऑपरेटर | ३०५०-४५९० | ०२ |
| १९. | वाहन चालक | ३०५०-४५९० | ०५ |
| २०. | शिपाई | २५५०-३२०० | १४ |
| २१. | सफाई कामगार (स्त्री १० व पुरूष १०) | २५५०-३२०० | २० |
| | | **एकूण :-** | **१६५** |

नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांवर १५ ते १७ लाख म्हणजे वर्षाकाठी रूपये २.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अधिसूचीत सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर महानगरपालिकेतर्फे सिडको भागातील मालमत्तांवर कर आकारणी करण्यात येवून त्या करांद्वारे महानगरपालिकेला अंदाजे रूपये १०.०० कोटी उत्पन्न मिळेल असा प्राथमिक अंदाज आहे. याचाच अर्थ सिडको भाग हस्तांतरण झाल्यानंतर ज्या सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे, त्यासाठी जो कर्मचारी वर्ग लागत आहे. त्यावर उत्पन्नाच्या २० % प्रतिवर्ष खर्च होईल, जो की, शासनाने दिलेल्या मापदंडानुसार बराच कमी आहे.

करीता वर उल्लेख केलेल्या विविध संवर्गातील पदांची निर्मिती करण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागाचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर महानगरपालिकेतर्फे त्या भागास मुलभूत सेवा सुविधा द्याव्या लागणार आहे. सिडको भागातील सेवा सुविधा देण्यासाठी महानगरपालिकेस खालीलप्रमाणे विविध संवर्ग निहाय कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करणेस व सदरील प्रस्ताव राज्य शासनास मंजुरीकरीता पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | संवर्ग | वेतन श्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | कार्यकारी अभियंता | १०६५०-१५८५० | ०१ |
| ०२. | उप अभियंता | ८०००-१३५०० | ०४ |
| ०३. | वैद्यकीय अधिकारी तथा घन कचरा व्यवस्थापक | ८०००-१३५०० | ०१ |
| ०४. | सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण विभाग) | ७४५०-११५०० | ०१ |
| ०५. | लेखाधिकारी | ७४५०-११५०० | ०१ |
| ०६. | कनिष्ठ अभियंता | ५५००-९००० | १२ (४ विद्युत व ८ स्थापत्य) |
| ०७. | कार्यालयीन अधिक्षक | ५५००-९००० | ०४ |
| ०८. | प्रमुख लेखापाल | ५५००-९००० | ०२ |
| ०९. | दुय्यम आवेक्षक (इमारत निरिक्षक) | ४५००-७००० | १६ |
| १०. | विद्युत पर्यवेक्षक | ४५००-७००० | ०८ |
| ११. | स्वच्छता निरिक्षक | ४५००-७००० | ०४ |
| १२. | वरिष्ट लिपीक | ४५००-७००० | १२ |
| १३. | कनिष्ट लिपीक | ३०५०-४५९० | ३५ |
| १४. | पशुधन पर्यवेक्षक | ४०००-६००० | ०२ |
| १५. | सहाय्यक उद्यान अधिक्षक | ४०००-६००० | ०१ |
| १६. | एम.पी.डब्ल्यु. | ४०००-६००० | १० |
| १७. | एस.एफ.डब्ल्यु. | ४०००-६००० | १० |
| १८. | संगणक ऑपरेटर | ३०५०-४५९० | ०२ |
| १९. | वाहन चालक | ३०५०-४५९० | ०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | शिपाई | २५५०-३२०० | १४ |
| २१. | सफाई कामगार (स्त्री १० व पुरूष १०) | २५५०-३२०० | २० |
| | | **एकूण :-** | **१६५** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दमडीमहल समोरील १००' फुट डी.पी. रस्त्यावर पुल बांधणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.७९,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात महानगरपालिका दमडी महल पुल पान क्र.१५४ अ.क्र.१४ या विशेष लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरील कामातील रू.२५,००,०००/- मार्च अखेर खर्च अपेक्षित आहे. उर्वरित खर्च सन २००६-२००७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात येईल. तरी रक्कम रू.७९,००,०००/- च्या निविदा काढण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दमडीमहल समोरील १००' फुट डी.पी. रस्त्यावर पुल बांधणेच्या रक्कम रू.७९,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-७ म्हाडा कॉलनी येथील रस्ते व खूली जागा महानगरपालिकेस हस्तांतर झालेली आहे. सदरील भागातील गाळा क्रमांक ०१ ते १६ चे मागील बाजूस म्हाडा कडून महानगरपालिकेस मिळालेले जागेस महानगरपालिकाने सभागृह बांधलेले आहे. या सभागृहाचे पूर्वेस मुख्य जळगांव रस्त्यापासून नविन रस्ता टाकून स्किम क्रमांक -५ च्या गृह योजनेसाठी रस्ता करणे आवश्यक आहे. गाळा क्रमांक-१ च्या पूर्वेस म्हाडाची ऑड शेप मध्ये जागा शिल्लक असून, ती जागा म्हाडा कडून घेवून त्यापुढे महानगरपालिकाचे जागेतून मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता तयार करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

सूचक : श्री.अनिल जैस्वाल, श्री.रविंद्र गांगे

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके,श्री.विनायक पांडे,श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,एन-७,म्हाडा कॉलनी येथील महानगरपालिकेस हस्तांतर झालेल्या खूल्या जागे लगत असलेल्या गाळा क्रमांक -१ च्या पूर्वेस म्हाडाच्या ऑड शेप जागेतून जळगांव मूख्य रस्त्यापासून नविन रस्ता तयार करण्यासाठी गाळा क्र.१ च्या पूर्वेस असलेली म्हाडाची ऑड शेप ची शिल्लक जागा म्हाडाकडून घेवून त्यापूढे महानगरपालिकाच्या जागेतून मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-०६ च्या मूळ अंदाजपत्रकात पान क्र.१७८ वर अ.क्र.९ वर वॉर्ड क्र.९ जयसिंगपुरा भागात जूनी ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र.रू.२.०० लक्षची तरतूद आहे. परंतु सदरील भाग हा अनधिकृत असल्यामूळे तेथे उपरोक्त काम होवू शकत नसल्यामूळे, प्रभाग क्र.९ मधील नागरीकांची पाण्याची टंचाई लक्षात घेता, विविध ठिकाणी हातपंप बसविण्याची मागणी केलेली आहे.

नागरीकांची मागणी लक्षात घेता पान क्र.१७८ अ.क्र.८ वरील तरतूद वळती करून र.रू.२.०० लक्ष वॉर्ड क्र.९ अंतर्गत विविध ठिकाणी हातपंप बसविणे या कामासाठी वर्ग करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री.पुरूषोत्तम ठाकुर अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ च्या मूळ अंदाजपत्रकात पान क्र.१७८ वर अ.क्र.९ वर वॉर्ड क्र.९ जयसिंगपुरा भागात जूनी ड्रेनेज लाईन बदलून नविन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत र.रू.२.०० लक्षची असलेली तरतूद **या ऐवजी** प्रभाग क्र.९ मधील पाण्याची टंचाई लक्षात घेता, विविध ठिकाणी हातपंप बसविण्यासाठी सदरील र.रू.२.०० लक्षची तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर ‘‘ राष्ट्रगीताने ‘‘ सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.